दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

## स्वयंसहायता बचत गटांचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन

प्रतिनिधी । बीड

ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान दिनांक २० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत वेळ सकाळी १० ते रात्री ११ वाजेपर्यंत उत्सव स्वयंसहायता समूहातील महिलांच्या प्रगतीचा, उत्सव महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव ईद बाजार व खाद्य जत्रा आणि जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ जिल्हा परिषद बीड येथे आयोजित करण्यात आलेले आहे.खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले असून प्रवेश विनामुल्य आहे. तरी सर्व जनतेने याचा लाभ घेऊन एकवेळ अवश्य भेट द्यावी असे आवाहन डी आर डी ए च्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१९४ गुरुवार,दि.२० मार्च २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-194 Thursday, Dt.20 March 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो.लि. बीडच्या दोन शाखेतून ४२,१७,४९०/- रूपयाचा मुद्देमाल जप्त

बीड:-ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो.लि. बीड चे बीड जिल्हयात २३ शाखा असुन सदर मल्टीस्टेट विरूद्ध बीड जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला आजपावेतो ७६ गुन्हे दाखल झाले असुन फिर्यादी मधील एकुण ४७,९९,९२,३६८/- रूपयाचा अपहार झाले बाबत तक्रारीमध्ये नमुद आहे. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेटचे आजपावेतो आर्थिक गुन्हे शाखा, बीड येथे एकुण ११५२७ ठेवीदार त्यांच्या एकुण- ६६०,१९,९९,०६९ /-रूपये रकमेची विश्वासघात व फसवणुक झाले बाबत तक्रारी व त्याबाबतचे पुरावे या शाखेत दिलेले आहेत. त्यावरून गुन्हयाचे तक्रारी मधील व प्राप्त ठेवीदार यांचे अर्ज असे एकुण-७०८, १९,९१,४३७ /- रूपये रकमेची फसवणुक झालेबाबत माहिती आजपर्यंत प्राप्त झालेली आहे. व त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ठेविदार यांचे तक्रारी अर्ज स्वीकारण्यासाठी आगुशा बीड येथे स्वतंत्र पथक तयार करण्यात आलेले आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सो.लि. बीड चे आरोपी संचालक मंडळ व इतर अधिकारी/ कर्मचारी यांचे नावावर असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तांची मा. नोंदणी महानिरीक्षक, यांचे कार्यालय, पुणे येथुन व स्थानिक सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे बीड जिल्हयातील विविध शाखे मधुन माहिती प्राप्त केली असता सदर मल्टीस्टेट मधील चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ यांचे नावे असलेली स्थावर मालमत्तेची माहिती प्राप्त करुन चझखऊ प्रस्ताव पुढील कायदेशीर कारवाईसाठी जा. क्र. वाचक/ आ.गु.शा./रा.म/एमपीआयडी / प्रस्ताव / २०२५- ४१५ बीड दि. १७/०३/२०२५ अन्वये मा. अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये चार वाहने (जीप), तीन सीपीयु व मुख्य कार्यालय बीड येथुन महत्त्वाचे दस्तऐवज असा एकुण रुपये ३२,८०,०००/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मुख्य शाखेचा पंचनामा करून ६,३४,३९०/- रोख रक्कम तसेच सारडा संकुल शाखेतुन ७३ ग्रॅम सोन व अंदाजे २५० ग्रॅम चांदीच्या मौल्यवान वस्तु जप्त केले असुन त्याची एकुण-किंमत- ३,०३,१००/- रू किंमतीचे मौल्यवान दागीने जप्त करण्यात आलेले आहे त्यांची एकुण किंमत- ४२,१७,४९० /- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.


तसेच सदर गुन्हयामध्ये आजपावेतो संचालक मंडळातील व इतर अधिकारी कर्मचारी यांचे एकुण- २५६ बँक खाते निष्पन्न केलेले आहे. त्यापैकी चालु स्थितीत असलेले बँक खाते ४७ आहेत त्यापैकी ४४ बँक खाते फ्रिज केलेले असुन त्यामध्ये- ६९,२८,६३६/- रूपये फ्रिज करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र ठेवीदार वित्तीय संस्थेतील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम (चझखऊ -उढ) १९९९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी एमपीआयडी प्रस्ताव




मा. अपर पोलीस महासंचालक, म. रा. मुंबई यांचे कार्यालयात पाठवण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छ. संभाजी नगर परीक्षेत्र, छ. संभाजीनगर, मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड, मा. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, विश्वांभर गोल्डे उपविपोअ बीड तथा पोलीस उप अधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ, सहा. पोलीस निरीक्षक, पांडुरंग भागीले सपोनि रत्नाकर घोळवे, व पोलीस अंमलदार सहा फौजदार मुकुंद तांदळे, मच्छिंद्र राख, अभिमान भालेराव, पोलीस हवालदार रामदास, विठठल, पोशि, संजय पवार व इतर अंमलदार यांनी केलेली आहे.

## बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध लागत नसल्याने आईचा युसुफ वडगाव पोलीस स्टेशन समोर आत्मदहनाचा इशारा



प्रतिनिधी । अंबाजोगाई

अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवत पळवून नेल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यात घडली असून या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यास गेलेल्या पालकांना युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे जाण्यास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथून सांगण्यात आले तदनंतर युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे फेब्रुवारी महिन्यात गुन्हा दाखल झाला आहे मात्र एक महिना उलटला तरी याबाबतीत कोणाचाही शोध लागला नाही नातेवाईकांनी पोलिसांकडे विचारपूस केली असता पोलीस उडवा उडवी ची उत्तर देत प्रकरण मिटवण्यास सांगत असल्याचा गंभीर आरोप मुलीच्या नातेवाईकांनी प्रतिनिधीशी बोलताना केला आहे. मुलीचा शोध लागत नाही म्हणून तिच्या आईने गुरुवार दिनांक २० मार्च रोजी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

सदरील हकीकत अशी की दि ०५ फेब्रुवारी रोजी दुपारी ०२ वा सुमारास मुलीची आई कुबेफळ ता अंबाजोगाई जि बीड येथे घरी असताना माझा गोबाईल वर माझा भाचा गोपाळ हरिभाऊ काळे याने माझी मुलीस मोबाईल वरून फोन करुन मी तुमची मुलीला घेऊन जात आहे असे म्हणाला त्यानंतर मी माझा भावास फोन करून मुलीस कॉलेजमध्ये जाऊन त्याला बघ असे त्याला सांगितल्यावर दुपारी ०४ वा सुमारास माझ्या भावाने मला फोन करुन सांगितले की साझी मुलगी व तुझी मुलगी या दोघी सकाळी १० वा घरुन कॉलेजला जाते म्हणुन घरुन गेल्या होत्या मी आता कॉलेज मधुन जाऊन पाहीले असता तुझी मुलगी ही कॉलेजमध्ये दिसली नाही पण माझी मुलगी ही कॉलेजमध्ये दिसली व तिने मला सांगितले की कॉलेजमध्ये गेल्यानंतर अंदाजे सकाळी १० वा सुमारास मुलीची आत्या मिरा हरिभाऊ काळे व तिचा मुलगा

(उर्वरीत पान २ वर)

## हादगांवातून आठ कृषी पंपाची चोरी, १ लाखाचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । केज

केज तालुक्यातील हादगाव शिवारातील बोभाटी नदी शेजारी असलेल्या वरलाकडील नावाच्या शेतातील चार शेतकऱ्यांचे १ लाख ४ हजार रुपये किंमतीच्या एकूण आठ पाणबुडी कृषिपंप रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन अज्ञात चोरटयांनी चोरून



नेल्याची घटना गुरुवार दि.१३ मार्च रोजी रात्री घडली या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील हादगाव येथील महादेव शिवाजी वायबसे वय ४५ वर्षे रा.हादगाव या शेतकऱ्याच्या वरला कडील शेत नावाच्या शेतातील ३० हजार रुपये किमतीचे दोन पाणबुडी कृषिपंप तसेच अमोल यादव या शेतकऱ्याचे ३९ हजार रुपये किमतीचे तीन पाणबुडी कृषिपंप व हनुमान

(उर्वरीत पान २ वर)

## घरकुल लाभार्यांचे थकीत हप्ते त्वरित वितरित करा - नारायण कुचे




प्रतिनिधी । अंबड

राज्यातील प्रधानमंत्री घरकुल आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, अहिल्याबाई होळकर घरकुल योजना, रमाई आवास योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना योजनेतील लाभार्थी यांचे थकीत हप्ते त्वरित वितरित करण्यासंदर्भात बदनापूर विधानसभेचे आमदार नारायण कुचे यांनी विधानसभा सभागृहात लक्षवेधीच्या माध्यमातून मंत्री महोदय यांचे लक्ष वेधले यावेळी मंत्री महोदय यांनी लवकरात लवकर हप्ते वितरीत करून वाढीव निधी देखील देण्याचे आश्वासन दिले

## गावंदरा येथे सरपंच व शाखा अभियंता यांनी संगणमत करून १५ वित्त आयोगाच्या निधीत केला भ्रष्टाचार

प्रतिनिधी । धारूर

तालुक्यातील गावंदरा येथे सरपंच व शाखा अभियंता ग्रामसेवक यांनी संगणमत करून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे . गावात नियमबाह्य पद्धतीने कामे करण्यात आली आहेत .अशी तक्रार गट विकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सदस्य छाया गोवर्धन बडे यांनी केली आहे .

(उर्वरीत पान २ वर)

## गोंदी पोलिसांची अवैध गोवंशाची जनावरे वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

प्रतिनिधी । शहागड

दि १७/०३/२०२५ रोजी गोंदी पोलिसांना माहिती मिळाली की शहागड येथे अवैध्य रित्या ०५ जनावरे वाहन क्रमांक चह २३ २२७१ यातून वाहतूक करीत आहेत मिळालेल्या माहितीवरून गोंदी पोलिस स्टेशन चे सपोनी आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक किरण हावळे, पोलिस उप निरीक्षक इब्राहिम शेख, पोलिस हवालदार अशोक नागरगोजे, गणेश मुंढे यांनी वाहनावर छापा टाकून त्यातील विनापरवाना वाहतूक करण्यात येणारी ०५ गो वंशाची जनावरेयांची सुटका केली. सदरची ०५ गो वंशाची जनावरे ही दत्तधाम गोशाळा, कुरण येथे जमा केली आहेत. त्यात वाहन चालक नामें सद्दाम ल्यार करेशी राहणार नवगाव तालुका पैठण यास अटक करून माननीय न्यायालयासमोर हजर केले असून गुन्हाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण हावळे करत आहे.



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

महाराष्ट्र शासन सत्यमेव जयते Aajeevika उमेद मार्ट MoFPI उमेद क्षितिज नवे, विश्वास नवा...
खास आकर्षण
प्रवेश विनामुल्य
ग्रामविकास व पंचायत राज विभाग
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद,बीड
गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार व खाद्य जत्रा
बीड जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन 2025
उत्सव स्वयं सहाय्यता समुहातील महिलांच्या प्रगतीचा
उत्सव महाखरेदीचा...! उत्सव महामेजवानीचा...!
एक वेळ आवश्य भेट द्या !
खाद्यपदार्थ | मसाले | ग्रामीण कलाकुसर | हस्तकला | ज्वेलरी
शाकाहारी व मांसाहारी जेवण आणि अजून खूप काही
कालावधी : दि.२०/०३/२०२५ ते दि.२४/०३/२०२५
- वेळ - सकाळी १०.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत.
स्थळ : जिल्हा परिषद,बीड



## संपादकीय

# हेही उखडणे जमेल ?

...काही निर्मिती करण्यापेक्षा विध्वंस योजणे अधिक सोपे असते. त्यात मागे जमाव आणि सत्ताधीशही असतील तर हे काम अधिकच सुलभ. पण 'इश्यू' जागता ठेवण्यासाठी विध्वंस इतक्यात होणार नाही...

इंग्रजीत 'कीप द पॉट बॉइलिंग' असा वाक्प्रचार आहे. म्हणजे एखादा मुद्दा सतत तापता ठेवणे. आपल्या देशात सतत असा तापता ठेवता येईल असा मुद्दा म्हणजे हिंदू-मुसलमान संघर्ष. असा संघर्ष नसेल तर तो निर्माण करा, निर्माण झालेला असेल तर तो शांत होऊ देऊ नका आणि तो निमालाच तर निखाऱ्यांवरची राख झटकून ही आग पुन्हा कशी भडकेल असे प्रयत्न करा असा या वाक्प्रचाराचा प्रचलित वातावरणातील अर्थ. हिंदू-मुसलमान मुद्दा नसेल तर मराठा-ओबीसी, दलित-दलितेतर, कथित उच्चवर्णीयविरोधात कथित कनिष्ठवर्णीय, ही विरुद्ध ती भाषा असा कोणता ना कोणता मुद्दा शोधा, तापवा आणि तापता राहील याची खबरदारी घ्या असा हा सांगावा. हे असे मुद्दे धुमसते ठेवणे अनेकांच्या सोयीचे असते. या अनेकांत राजकारणेतरही अनेक येतात. उदाहरणार्थ माध्यमे, सुरक्षा यंत्रणा, बाजारपेठ इत्यादी. माध्यमांकडे या काळात बहुतांशांचे अधिक लक्ष जाते म्हणून माध्यमे खूश. सुरक्षा यंत्रणांस त्यांचा अंमल चालवता येतो आणि हात 'साफ करून' घेता येतात म्हणून ते खूश. बाजारपेठ आनंदी कारण अनेक वस्तूंची मागणी वाढते आणि अधिक काही गंभीर होईल या भीतीने माणसे अनावश्यक चीजवस्तूही खरेदी करून ठेवतात. अखेर लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे भीतीचीसुद्धा एक मोठी बाजारपेठ असते आणि अन्य कोणत्याही बाजारपेठेप्रमाणे ती गजबजती राहील हे पाहणे बाजारपेठ धुरीणांचे कर्तव्य असते. हे सत्य एकदा का लक्षात घेतले की सध्या औरंगजेबाच्या कबरीवरून सुरू ठेवण्यात येत असलेल्या वादाचा अर्थ लावता येईल.

कारण यात औरंगजेब हा केवळ निमित्त आहे. त्याच्या कबरीचा वाद पेटवणाऱ्या आणि नंतर तो पेटता ठेवणाऱ्यांच्या सूत्रधारांस हे ठावके नाही, असे नाही. छत्रपती शिवाजी महाराज महान ठरतात याचे कारण त्यांनी आदिलशहा, निजामशहा अशा किरकोळ शाह्यांचा बीमोड केला इतकेच नाही, तर या सर्व शाह्यांस पुरून उरलेल्या कर्दनकाळ 'दुष्ट'द्युम्न औरंगजेब आणि मुघलांचाही त्यांनी पाडाव केला. महाराज म्हणून अधिक वंदनीय ठरतात. छत्रपतींच्या आसपास, आगेमागे अनेक राजपूत वा हिंदू धर्मीय राजे होते. त्यांस जे साध्य झाले नाही, ते छत्रपतींनी करून दाखवले. आलमगीराच्या क्रौर्याचे आणि तरीही त्याच्या बीमोडाचे मोठेपण त्याच्या कबरीच्या ध्वस्ततेची मागणी करणाऱ्यांस माहीत नाही, असे नाही. वास्तविक छत्रपतींनी टोपीकरांस ज्या रीतीने धुडकावले तो मुत्सद्देगिरीचा सर्वोत्कृष्ट नमुना ठरावा. पण त्याचा गवगवा तितका केला जाणार नाही. कारण उघड आहे. टोपीकर ख्रिश्चन होते आणि औरंगजेब मुसलमान. त्यामुळे त्याचा संबंध पाकिस्तानशी आणि त्याद्वारे देशातील इस्लाम धर्मीयांशी जोडायची सोय आहे आणि ती ध्रुवीकरणाच्या राजकारणासाठी गरजेची आहे. गोऱ्या टोपीकरांशी आपला थेट वाद नाही. ते बौद्धिकदृष्ट्या झेपणारेही नाही. त्यापेक्षा सद्या:स्थितीत इस्लामींना चेपणे अधिक सोपे आणि सोयीचे. 'घर मे घुसके मारेंगे'ची शूरभाषा म्हणूनच केली जाते ती फुटक्या पाकिस्तानबाबत. खरेतर आपल्या 'घरात' खऱ्या अर्थाने घुसलेला आहे तो चीन. पण त्याच्याबाबत मात्र सौहार्दाची, मैत्रीपूर्ण शांततेची भाषा! त्यामागील कारणही तेच. धर्म आणि सामर्थ्याचा आकार. चीनबाबत अशी भाषा आपल्याला पेलवणारही नाही आणि ते न पेलवणे सर्वांना दिसणे राजकीयदृष्ट्या परवडणारे नाही. तेव्हा सुमारे ४०० वर्षांपूर्वीचा औरंगजेब बरा. त्याच्या नावे बोटे मोडणे, कबरीवर थुंकण्याची भाषा करणे इत्यादी शौर्यदर्शक कृत्ये सद्या:स्थितीत राजकीयदृष्ट्या सोयीची आहेत. खेरीज हे असले आदिम मुद्दे पटवून देणे सोपे आणि पेटवणे त्याहूनही सोपे. सबब औरंगजेब हा केवळ निमित्त.

**अंबड नगर परिषद अंबड जि.जालना**

**जा.क्र.न.प./अंबड/कार्या-६/२०२५/४३९**
**दि.१७.०३.२०२५**

**ई-निविदा नोटीस**

मुख्याधिकारी अंबड नगर परिषद हे न.प.निधी अंतर्गत मातीचा पुतळा बनवणे इत्यादी अनुषंगीक कामे करणे. करीता निविदा टक्केवारी बी-१ फॉर्ममध्ये अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील निविदा ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

सदर निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दीपत्रक इत्यादीची माहिती नगर परिषद कार्यालयात दि.१९.०३.२०२५ पासुन उपलब्ध होईल.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१३२**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- ११/०३/२०२५**

अर्जदार श्री./ :- श्री नवनीत बन्सीलाल राठी रा.अंबड ता.अंबड जि.जालना प्रकरण :- सर्व्हे नं.३४ प्लॉट नं.६/२ न.प.घर.नं.१८-९१-६/२ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( --------- ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नं.६ चा उर्वरित भाग
पश्चिम :- प्लॉट नं.५ चा उर्वरित भाग
दक्षिण :- कॉलनी अंतर्गत ०९ मी रुंदीचा रोड
उत्तर :- सर्व्हे नं.३४ चा भाग

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# आझाद क्रांती सेनेच्या वतीने वडवणीत गायरानधारक संवाद परिषद संपन्न

## आंबेडकरी चळवळीचा रथ पुढे नेहू-सिद्धार्थ शिंगारे

प्रतिनिधी । वडवणी

अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील गायरान जमीनीचा लढा सुरू आहे जमीन मिळत नाही त्या जमिनीचा सातबारा मिळत नाही ती जमीन गायरानधारकांना अजूनही देण्यात आली नाही यासाठी सरकारने गायरान धारकांना जमीन देण्यात यावी त्याचा सातबारा त्यांच्या नावे करण्यात यावा यासाठी आझाद क्रांती सेनेच्या वतीने आज दिनांक १९/०३/२०२५ रोजी वडवणी शहरातील बचत गट भवन येथे गायरान भारत संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला विशेष उपस्थिती कडुदास कांबळे आझाद क्रांती सेनेचे महासचिव, सिद्धार्थ शिंगारे आंबेडकरी चळवळीचे अभ्यास, बजरंग ताटे मराठवाडा गायरान वहीतीधारक जनसंसद, अप्पाराव मोरताटे गायरान मोर्चा, नागनाथ चव्हाण वंचित हक्क आंदोलन, बाबुराव गालफाडे बहुजन अधिकारांदोलन, माया शिंदे श्रमिक मानव अधिकार संघ, तसेच प्रमुख उपस्थिती अशोक ढगे तालुकाप्रमुख माजलगाव आझाद क्रांती सेना, महादेव उजगरे आरपीआय वडवणी तालुका अध्यक्ष, बाबासाहेब साळवे गौतम दादा भालेराव मित्र मंडळ, विलास कारके युवा नेते आझाद क्रांतीसेना, केरबा कसबे धारूर तालुका उपप्रमुख आझाद क्रांती सेना, सुभाष मोमीन तालुका उपप्रमुख बीड आझाद क्रांती सेना, बळीराम मस्के तालुकाप्रमुख आझाद क्रांती सेना धारूर, तर स्वागत उत्सुक महादेव आव्हाड तालुकाप्रमुख आझाद क्रांती सेना



वडवणी, मंगेश शिंदे तालुका महासचिव आझाद क्रांती सेना, लक्ष्मण पाटोळे तालुका उपप्रमुख ऊसतोड मजूर आझाद क्रांती सेना, अंकुश आढागळे नेते आझाद क्रांती सेना, दत्ताभाऊ गायकवाड कवडगाव सर्कल प्रमुख, अरुण आव्हाड, लक्ष्मण आव्हाड, तुकाराम शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. त्यानंतर प्रस्ताविक अशोक ढगे यांनी केले ते म्हणाले की, आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळावा म्हणून आम्ही रात्रंदिवस काम करत आहोत. समाजातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या लढ्यामध्ये सहभागी व्हावे असे यावेळी आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर नागनाथ चव्हाण यांनी सविस्तर गायरान संदर्भात गायरनधारकांना मार्गदर्शन केले व त्यांच्यासोबत संवाद साधला. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्यातील ढाण्या वाघ बजरंग भाऊ ताटे यांनी हा लढा फक्त गायन संदर्भात नसून आपल्या जीवनाचा लढा आहे तो यशस्वी करण्यासाठी आपल्या सर्वांना एकत्र येण्याची गरज आहे. मग तो कुठल्याही संघटनेचा असो या पक्षाचा मात्र लढा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावं असे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर राम लगाडे यांनीही गायरानधारकांसोबत संवाद साधला अनेक विविध विषयावर चर्चा केली व गायरानधारकांना वेळोवेळी मार्गदर्शनाची गरज आहे.

# केरसुनीच्या व्यवसायातून मुलाला घडवले

## नाकलगाव चा संजय गायकवाड महाराष्ट्र सुरक्षा बलात दाखल

प्रतिनिधी । दिंद्रुड

आई-वडीलांनी गावोगावी व रानोमाळ भटकून केरसुनी (झाडू) बनवण्यासाठी लागणारी झाडी (सिंधीची पनाळी) तोडून बनवलेल्या झाडु - दुरडीच्या विक्रीतुन मिळणाऱ्या मोजक्या पैशातून मुलगा मोठा अधिकारी होण्याचे बघितलेले स्वप्न मुलाने पुर्ण केले. महाराष्ट्र सुरक्षा बलात नाखलगाव चा संजय दाखल होत आहे. सर्वसामान्य गायकवाड कुटुंबातील संजयच्या या यशाचं सर्वत्र कौतुक होत आहे.

माजलगाव तालुक्यातील नाखलगाव येथील मसाजी गायकवाड यांचा केरसुणी व दुरडी बनवण्याचा परंपरागत व्यवसाय आहे. अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गायकवाड यांना आपल्या मुलाने सरकारी अधिकारी व्हावे अशी इच्छा होती. आई जाईबाई व वडील मसाजी गायकवाड यांनी रानावनात भटकत झाडू व दुरडी साठी लागणारी सिंधीची झाडी गोळा करून व अपार कष्ट करून विक्री केलेल्या झाडू - दुरडी च्या विक्रीतून मिळालेल्या पैशातून संजय या मुलाचे संगोपन केले. गतवर्षी धुळे येथील एम एस एफ कॅम्प मध्ये सरावासाठी संजय दाखल झाला होता. त्याची ट्रेनिंग आता पूर्ण झाली आहे. मुंबई येथील महाराष्ट्र सुरक्षा बलात तो दाखल होणार आहे. यासाठी संजयने गेल्या पाच वर्षांपासून प्रचंड मेहनत घेतली. अंग मेहनती सोबत अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयात १८ तास अभ्यास केला. वेळप्रसंगी ग्रंथालयात झोपल्याचे तो सांगतो. आपल्या आई वडिलांनी केलेल्या कष्टाचे फळ मला मिळाले असून भविष्यात गोरगरीब कुटुंबातील तरुणांनी राजकारणातील कार्यकर्ते होण्यापेक्षा आई-वडिलांचे कष्ट पाहून सुकर भविष्यासाठी योग्य तो निर्णय घेत परिश्रम करावे असं संजय सांगतो. १.आम्ही संजय साठी घेतलेल्या अपार कष्टाचे फळ



आम्हाला मिळाले आहे. आमच्या कष्टाचे चिज संजयने केले आहे. आता भविष्यात आमच्या मनातील त्याच्याबद्दलची काळजी मिटली आहे. त्याने सुखात जगावे,आमचा परंपरागत असलेल्या व्यवसायात अपार कष्ट आहेत. रानावनात व दारोदार भटकंती करण्याची वेळ माझ्या मुलावर येणार नाही यामुळे आम्ही आनंदी आहोत.

- मसाजी गायकवाड

२. आजकालची तरुणाई मोबाईलच्या पुर्णतः आहारी गेली आहे. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी रील स्टार्स होण्यात त्यांना रस आहे. मात्र संजय गायकवाड ने घेतलेली मेहनत व अपार कष्ट, त्याच्या आई - वडिलांनी दिलेली साथ ही सर्वसामान्य कुटुंबातील सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.



# एकनाथ षष्ठी निमित्त वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिनिधी । बीड

पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील एकनाथी षष्ठी निमित्त आलेल्या वारकऱ्यांसाठी व भाविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर मंगळवार ते बुधवार दोन दिवस ठेवण्यात आले आहे मंगळवार सकाळपासून एकनाथ षष्ठी निमित्त दावरवाडी गावामध्ये पायी चालणाऱ्या दिंडी वारकऱ्यांसाठी जागोजागी भोजन व्यवस्था पाणपोई आरोग्य तपासणी शिबिर गावातील लोकांनी सोय केली होती आज आरोग्य तपासणी शिबिरात ५० ते ५५ वारकऱ्यांनी तपासणी केली अंग दुखणे ताप थंडी सर्दी खोकला एकनाथ षष्ठी निमित्ताने वारकऱ्यांची आज तपासणी करण्यात आली हा उपक्रम संत गजानन महाराज सेवा संस्था दावरवाडी संचलित शांती ब्रह्म श्री संत एकनाथ महाराज नाथ षष्ठी निमित्त येणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर लावण्यात आले या शिबिरासाठी योगदान व नामांकित डॉ. बाळासाहेब दूधे (बी एच एम एस) गजानन महाराज सेवा संस्थानचे रवींद्र सातपुते गुरु कृपा अग्रोचे कमलाकर जगताप दीपक शिंदे शंतनू जगताप पवार फेब्रिकेशन सुरेश तावरे चक्रधर लोहगळे या सर्वांनी वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीरासाठी आयोजन केले होते

**पान १ वरून...**

**हादगांवातून आठ....**

चांगदेव हांगे या शेतकऱ्याचा २५ हजार रुपयाचा एक कृषिपंप,व बाबासाहेब महादेव वायबसे यांचा १० हजार रुपये किमतीचा एक पाण बुडी कृषिपंप असा एकूण १ लाख ४ हजार रुपये किमतीचे एकूण आठ कृषी पंप हादगाव शिवारा तील वरालाकडील शेता तून अज्ञात चोरटयांनी लंपास केलेअसून महादेव शिवाजी वायबसे यांनी सोमवार दि.१७ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादी वरून केज पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शना खाली जमादार बाबासाहेब बांगर करीत आहेत.

**गावंदरा येथे सरपंच....**

गावंदरा येथे मागील दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून लाखो रुपयांचा निधी प्राप्त झाला होता .परंतु या ठिकाणी सरपंच , ग्रामसेवक व शाखा अभियंता यांनी संबंधित सदस्यांना व गावास अंधारात ठेवून मोठ्या प्रमाणात नियमबाह्य पद्धतीने कामे करण्यात आलेले आहेत .विकासासाठी आलेल्या निधीची जीईएम पोर्टल वर बोगस खरेदी दाखवून अनियमितपणे विल्हेवाट लावली आहे .तर काही कामात शाखा अभियंता ऋतुराज लांब व सरपंच यांनी संगणक करून चुकीचे मोजमापे करून निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली आहेत .करण्यात आलेल्या १५ व्या वित्त आयोगाच्या खर्च करण्यात आलेल्या निधीची चौकशी करून दोषी असणाऱ्या सरपंच , ग्रामसेवक व शाखा अभियंत्यावर कारवाई करण्यात यावी .आठ दिवसात चौकशी करून कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असाही इशारा गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सदस्य छाया बडे , गोवर्धन संभाजी बडे यांनी दिला आहे .

**बेपत्ता अल्पवयीन मुलीचा..**

गोपाळ हे कॉलेजच्या समोर दिसले त्यावेळी ती म्हणाली की तु पुढे जा मी आत्याला बोलुन

**पान १ वरून...**

येते त्यावेळेस थोड्या अंतरावर गेली असता मुलीला तिची आत्या मिरा व तिचा मुलगा गोपाळ याने तुझ्या सोबत माझ्या मुलाला लग्न कारायचे आहे असे सांगुन तिला लग्नाचे अमिष दाखवुन, फुस लावुण चार चाकी वाहनात बसवून घेऊन गेले आहेत असे मला सांगितल्याने मी त्यानंतर कुंबेफळ येथुन निघुन ०६.०० वा सुमारास अंजनपुर येथे गेले व माझ्या भावाची मुलगी भेटली तिने सकाळी आपेगाव येथे झालेला प्रकार मला सांगितला त्यांनतर आम्ही माझी मुलगी हीचा अजनपुर, कोपरा धानोरा गावात तसेच नातेवाईक यांच्या कडे शोध घेतला परंतु माझी मुलगी मिळुन आली नाही. त्यानंतर दि ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी मी व माझा मुलगा असे आम्ही आपेगाव येथे कॉलेजमध्ये जाऊन माझ्या मुली बाबत चौकशी केली असता तेथील शिक्षकांनी ती काल दि ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी पेपरला गैरहजर राहीलेली आहे असे आम्हाला सांगितले त्यानंतर आम्ही भावठांना येथे जाऊन मुलीचा शोध घेतला असता ती दिसून आली नाही तसेच तिची आल्या मिरा हरिभाऊ काळे व मिराचा मुलगा गोपाळ हे पण त्यांचे घरी भावठाणा येथे मिळुन आले नाहीत म्हणुन आमची खात्री झाली की माझ्या मुलीला आत्या मिरा हरिभाऊ काळे व तिचा मुलगा गोपाळ रा भावठाणा हेच फुस लावुन पळवून नेले आहे त्यानंतर आजपर्यंत आम्ही आमचे व त्याचे सर्व नातेवाईकांकडे त्यांचा शोध घेतला परंतु तेन मिळून आले नाहीत. तरी दि ०५/०२/२०२५ रोजी १०.०० वा सुमारास माझी मुलगी हीची आत्या मिरा हरिभाऊ काळे व मिरा हीचा मुलगा गोपाळ हरिभाऊ काळे रा भावठाना ता अंबाजोगाई यांनी लग्नाचे अमिष दाखवुन जय किसान माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय आपेगाव येथुन चार चाकी वाहनात बसवुन घेऊन गेले आहेत म्हणून माझी त्यांचविरुद्ध तक्रार आहे अशी फिर्याद मुलीच्या आईने दिली आहे.

मात्र फिर्याद देऊन एक महिना उलटला तरी पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेत असून उडवा उडवीची उत्तरे देत आहेत व प्रकरण मिटवण्याची भाषा करत असल्या मुळे तसेच काहीही करून मुलगी मिळत नाही पोलीस प्रशासन ही साथ देत नाही या नैराश्येतून मुलीच्या आईने २० मार्च २०२५ रोजी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

# पत्रकारांना शिवीगाळ किंवा धमकी दिल्यास तीन वर्षाचा तुरुंगवास

केज/प्रतिनिधी

हायकोर्टाच्या टिकेनंतर पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे की, पत्रकारांना शिवीगाळ, धमकी तसेच असभ्य वर्तन करणाऱ्यांना मोठी किंमत मोजावी लागणार असून ५० हजाराचा दंड आणि गैरवर्तन करणाऱ्या ला तीन वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.या संदर्भात अधिक माहिती अशी की,प्रेस कॉन्सिलने देशाचे कॅबिनेट सचिव, गृहसचिव,मुख्यमंत्री,मुख्य सचिव आणि राज्याच्या गृहसचिव यांना सूचना पत्र पाठविलेआहे.यामध्ये पत्रकारांना धमकी देणाऱ्याला तुरुंगात पाठविण्यात येणार असून पत्रकारांना धमकावल्या प्रकरणी अटक करण्यात आलेल्यांना सहजासहजी जामीन मिळणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.पत्रकारांना अडचणी आल्यास त्यांनी त्यांच्याशी संपर्क करावा. पत्रकार यांना मदत करा व आदराने बोला नाहीतर तुम्हाला मोठी किंमत मोजावी लागेल असे मुख्यमंत्री योगी यांनी सांगितले.गैरवर्तन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर एफ आय आर नोंदवला जाईल. नाही तर एम एस पी कारवाई केली जाईल. पत्रकार जमावाचा भाग नाहीत हीच बाब लक्षात घेऊन प्रेस कॉन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मार्कंडेय काटजु यांनी प्रत्येक राज्य सरकारांना ताकीद दिली असून पत्रकारांशी गैर वर्तन करू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत.कोणत्याही ठिकाणी हस्तक्षेप किंवा हाणामारी करू शकत नाही.जसा एखादा वकील आपल्या आशिलाचा हत्येचा खटला न्यायालयात लढत असतो तसा तो कोणी होत नाही अगदी तसेच पत्रकार त्यांचे काम सार्वजनिक ठिकाणी करतात पण ते गर्दीचा भाग नसतात.त्या मुळे पत्रकारांना त्यांचे कामापासून रोखणे हे माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे.या संदर्भात प्रेस कान्सीलने देशाची कॅबिनेट सचिव, गृहसचिव,मुख्यमंत्री मुख्य सचिव व सर्व राज्यांच्या गृहसचिवांना सूचना पाठविल्या असूनपत्रकारां सोबत पोलीस किंवा निम लष्करी दलाकडूनहोणारा हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही असे स्पष्ट पणे नमूद करण्यात आले आहे.पत्रकारावर असे कोणतीही कृती होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी. पत्रकारांसोबत पोलिसांनी केलेला हिसाचार हाप्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन मानले जाईल.जो घटनेच्या कलम १९ मध्ये देण्यात आला आहे.घटने च्या या कलमानुसार गैरवर्तन करणाऱ्या पोलीस किंवा अधिकार्यांवर गुन्हा दाखल केला जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे

# रण फॉर परळी मॅरेथॉन मध्ये धावली तरुणाई

प्रतिनिधी । सिरसाळा

सामाजिक कार्यकर्ते मयांक गांधी यांच्या ग्लोबल ट्रस्टच्या वतीने आयोजित 'रन फॉर परळी' मॅरेथॉन स्पर्धा सिरसाळ्यात मोठ्या थाटात व तरुणाईच्या उत्साहात पार पडली. विशेषत ह्या स्पर्धेत प्रसिद्ध अभिनेते मिलिंद सोमन आपली पत्नी अंकीता सह सहभागी होत सिरसाळ्यातील रस्त्यावर धावले, परळी /सिरसाळ्यात प्रथमच एवढ्या भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मॅरेथॉन मध्ये सायकल, धावणे अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या ,वेगवेगळ्या वयोगटातील तरुण - तरुणी सहभागी झाल्या होत्या. मिलिंद सोमण ह्या मॅरेथॉन चे आकर्षण असल्याने तरुणा मध्ये अधिकच उत्साह निर्माण झाला . आरोग्य, फिटनेस चे मानवी जीवनात किती महत्व आहे हा संदेश ह्या मॅरेथॉन स्पर्धेतून दिला गेला . सकाळी ७ वाजल्यापासून स्पर्धेस अर्जुनेश्वर विद्यालया पासुन सुरवात झाली. या ठिकाणा पासुन ग्लोबल विकास ट्रस्ट च्या मुख्य संकुल पर्यंत पायी धावणे स्पर्धा होती . स्पर्धेत युवक युवती सोबत मिलिंद सोमण त्यांची पत्नी अंकित तसेच तहसीलदार व्यंकटेश मुंडे, माजी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर सहभागी धावले , स्पर्धेची सांगता ग्लोबल विकास ट्रस्ट संकुल येथे तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करुन विजेते स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक, रोख बक्षीस देऊन करण्यात आली . सदरील स्पर्धेस पोलीस प्रशासनाचे चोख ठेवला होता. पोलीस प्रशासनाच्या वतीने पीएसआय आनंद जाधव यांनी बंदोबस्त पाहिला तर गरज पडल्यास इमरजन्सी उपचारासाठी म्बूलेन्स व डॉक्टरांचे पथक देखील नियोजित होते .

मिलिंद सोमण यांचा 'पुश-अप सेल्फी' चॅलेंज !

मिलिंद सोमण यांच्या सोबत अनेकांनी सेल्फी फोटो घेण्यासाठी गर्दी केली होती परंतु सोमण यांनी नागरिकांना फिटनेसचा नवा फंडा दिला वीस पुश ( डिप्स ) करायचे आणि मगच सेल्फी घ्यायचा, उपस्थितांनी देखील



प्रतिसाद देत पुश अप मारत सोमण यांच्या सोबत सेल्फी घेतली, या फॉर्मुल्या मुळे शेकडो युवक - युवतींना व्यायामाचे महत्व पटले आहे . मिलिंद सोमण यांच्या या 'पुश-अप सेल्फी' चॅलेंजला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाच परंतु या मुळे एक प्रकारे उत्साहात भर पडली .

देशभरात परळीची इमेज पॉझिटिव्ह करायची आहे

पत्रकारांशी बोलतांना ग्लोबल विकास ट्रस्ट चे सर्वा सर्वे मयांक गांधी बोलतांना म्हणाले कि, या ठिकाणी आम्ही शेती व शेतकऱ्यांसाठी काम करतोत,परंतु जेव्हा आम्ही बाहेर मुंबई, दिल्ली येथे जातोत तेव्हा तिथले लोक आम्हाला परळी /बीड बाबत निगेटिव्ह बोलतात, खून ,भ्रूण हत्या सारखे घटनांचा ते संदर्भ देतात परंतु आम्ही इथे काम करत असतांना जाणवते कि,परळी /बीडचे लोक चांगले आहेत. घडलेल्या घटना प्रसार माध्यमातून देशभरात जातात आणि या मुळे लोकांमध्ये परळी/ बीड विषयी निगेटिव्हीटी तयार होते आहे . परळीची निगेटिव्ह इमेज आम्हाला बदलायची आहे. देशभरात परळीची पॉझिटिव्ह ओळख निर्माण करायची आहे म्हणूनच आम्ही रण फॉर परळी मॅरेथॉन स्पर्धे घेतली आहे. एक चांगला संदेश या माध्यमातून पोहचणार आहे . असे मयांक गांधी म्हणले आहेत.

आरोग्य जपले तरच प्रत्येक अडचणीला सामोरे जाता येते - सोमण :

तरुणांना व्यायामाचे महत्त्व सांगत असतांना मिलिंद सोमण म्हणाले कि,आरोग्य खुप महत्वाचे आहे,आरोग्य ठिक असेल तर आपण प्रत्येक अडचणींना तोंड देऊ शकतो,आरोग्य ठिक नसेल तर खुप अडचणींचा सामना करावा लागतो, स्वतासाठी वेळ दिला पाहिजे ,शरीराची काळजी घेऊन शरीराची ताकत वाढवली पाहिजे असा संदेश अभिनेता मिलिंद सोमन यांनी दिला आहे.

विजेते स्पर्धक मुले , ३ किमी : रोहित शिवाजी बिन्नार,अंकित मानसिंग इदोलिया,प्रणव दिलीप राठोड

विजेते स्पर्धक मुली,३ किमी :
दिव्या दत्ता राठोड,अंजली जितेंद्र पंडित, शिवकन्या मोहन चौरे

विजेते स्पर्धक, मुले ५ किमी :
चैतन्य मुकींदा रुपनर ( सांगली),पाराजी बाबुराव गायकवाड ( परभणी ),जयश विलास पाटील ( जळगाव )

विजेते स्पर्धक, मुली ५ किमी :
प्रणाली संजय शेगोकार ( शेगाव),अश्विनी मदन जाधव ( सिरसाळ ) , गवते ज्योती शंकरराव ( परभणी )

सायकलिंग : नरेंद्र गंगाधर सोमवंशी ( लातूर ) तन्मय संतोष तिडके ( बीड ) , युवराज दिपक गिरी ( सिरसाळा )

# आला उन्हाळा आरोग्य सांभाळा.....!

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज



हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## चाळण झालेल्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नाही मात्र चांगल्या रस्त्यावरच दुबार काम ;

नगरपालिकेचा मनमानी कारभार ; सोमवारी आंदोलनाचा ईशारा-डॉ.गणेश ढवळे

बीड: बीड शहरातील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने शहरातील बहुतांश रस्त्याची चाळण झालेली आहे.त्यामुळे वाहनचालकांना मुठीत जीव घेऊन कसरत करत वाहन चालवावे लागते. शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज रस्त्याची पुर्ण चाळण झालेली आहे.या रस्त्यावर खड्डे,वाळु,वाळु मिश्रित खडी, असल्याने धुराळा उडत असुन नागरीकांना श्वसनाचे आजार जडण्याचा धोका आहे.या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरीकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासनाला केलेली आहे.मात्र नगरपरिषद प्रशासन दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे रडगाणे गात आहे.मात्र याचवेळी प्रमुख



रहदारीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्या ऐवजी नगरपालिकेने नगरपालिका कार्यालयासमोरील केवळ नगरपालिकेत येणाऱ्या वाहनांची वर्दळ असणाऱ्या आणि रस्त्यावर कुठेही खड्डे नसताना चांगल्या सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावरच पुन्हा दुबार सिमेंट रस्त्याचे काम केले आहे. त्यामुळे एकंदरीतच प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नसल्याचे कारण सांगणा-या नगरपालिका प्रशासनाने चांगल्या रस्त्यावरच दुबार रस्ता करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी का केली?? हा प्रकार ठेकेदारांचे खिसे भरण्याचा प्रकार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असून मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत या मागणीसाठी सोमवारी या प्रकरणी नगरपरिषद कार्यालयावर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# नवीन रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्या

## खा.बजरंग सोनवणे यांच्या मुंबईतील बैठकीत अधिकाऱ्यांना सुचना, दोन्ही विभागाकडून घेतला आढावा

केज/प्रतिनिधी

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून सर्व्हेक्षणाच्या कामाला गती द्या, राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट असलेली कामे तातडीने पुर्ण करा, नवीन दोन रस्ते दर्जोन्नत करुन राष्ट्रीय महामार्ग करावेत अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी दिल्या.

दि.१७ मार्च रोजी दिल्ली येथील संसदेत बीड रेल्वे जंक्शन व रेलमार्ग कामांनी गती देण्यासाठी आवाज उठविला होता. यानंतर दि.१८ रोजी सरव्यवस्थापक कार्यालय, सीएसटी मुंबई येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला सरव्यवस्थापक धरमवीर मीना, एस.एस. गुप्ता, ए.के.पांडे, सीपीआरओ स्वप्नील निला, डीजीएम के.के.मिश्रा यांची उपस्थिती होती. यावेळी अश्विनी वैष्णव यांनी धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी दिला असून आता तातडीने सर्व्हेक्षणाचे काम सुरू करावे, अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वेचे काम सुरू आहे. आता अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी झालेली आहे. तर पुढील कामाला गती देऊन लवकरात लवकर परळीपर्यंतचे काम पुर्ण करावे, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामामुळे काकडवाडी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, कारेगाव, विघनवाडी, हिवरसिंगा, चऱ्हाटा, ढोलेवस्ती आणि इतर ठिकाणी सडक वाहतूक बाधित झाली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, वृद्ध आणि प्रवाशांना अडचणी येत आहेत. यासाठी या ठिकाणी तसेच बीड-परळी मार्गावरील आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कार्यवाही करावी, अशा सुचना दिल्या तर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीत केंद्रीय दळणवळण विभागाचे विभागीय अधिकारी प्रशांत फेगडे यांचेसह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सर्व मुख्य अभियंते, कार्यकारी अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी अहमदपूर-धायगुडा पिंपळा-अंबाजोगाई-लोखंडी सावरगाव-केज-मांजरसुंबा या मार्गाला दुहेरी राष्ट्रीय महामार्ग करणे, लातूर-बर्दापूर-लोखंडी सावरगाव या मार्गासही दुहेरी मार्ग करणे, परतूर-माजलगाव-धारूर-केज-कळंब-येरमाळा-कुसळंब या मार्गातील अर्धवट कामे पुर्ण करणे, खरवंडी- आर्वी- ब्र. येळंब- न. राजुरी-बीड- वडवणी- परळी रस्ता पूर्ण करुन सुधारणा करणे, मांजरसुंबा ते चुंबळीफाटा मार्गातील अडथळे योग्य त्या उपाययोजना पुर्ण करून काम पुर्ण करणे, पैठण- पंढरपूर रा.मा. मधील मळेकरवाडी घाटामधे तातडीने डांबरीकरण



### धारूर घाटावर फोकस

धारूर घाटात अनेक अपघात होऊन प्रवाशांचे बळी गेलेले आहेत. सदरील घाटाचे काम व्हावे, यासाठी खा.बजरंग सोनवणे वारंवार पाठपुरावा करत असून या घाटासाठी पर्यायी मार्ग कामाला मंजूरी मिळालेली असून तातडीने निवीदा प्रक्रिया पुर्ण करावी आणि कामाला सुरूवात करून काम पुर्ण करावे, याबाबतही अधिकाऱ्यांना बैठकीत सुचना दिल्या.

### या मार्गांना दर्जोन्नतीचा प्रस्ताव :

पिठ्ठी-लिंबादेवी-गारमाथा-अंमळनेर-धामनगाव-टाकळी काझी, तर दुसरा उमापूर फाटा ते उमापूर-शेवगाव या दोन मार्गांना दर्जेन्नती करणे, या विषयावर बैठकीत चर्चा झाली असून या कामासाठी अधिकाऱ्यांनी सदरील प्रक्रिया राबविण्यास सुरूवात करू, असे म्हटले. दोन्ही मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते.

## अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या विद्याताई तारळकर नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधी

**दारव्हा येथे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद द्वारा जागतिक महीला दिनाच्या निमित्ताने नारी शक्ती सन्मान व कोष्टी समाज मेळावा संपन्न झाला. यावेळी कर्तृत्ववानमहिला हा पुरस्कार विद्याताई तारळकर यांना यवतमाळ दारव्हा येथे प्रदान करण्यात आला.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखित महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान व गौरव करण्यात आला.यावेळी**

प्रमुखउपस्थिति जगत्गुरु श्री श्री श्री दयानंदपुरी महास्वामीजी पिठाधिश, गायत्रीपीठ हम्पी हेमकुट, कर्नाटक हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये ना.संजयभाऊ राठोड मंत्री,मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री यवतमाळ हे होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष,देवांग, देवांगण,कोष्टी,कोष्टा फेडरेशनचे अध्यक्ष श्री.अरुणरावजी वरोडे, महिला प्रदेश अध्यक्ष सौ मंदाकिनीताई टकले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. सतिशराव दाभाडे, श्री.पंडितराव विधाते, श्री.विष्णूभाऊ कुटे, अध्यक्ष सौ.शैलाताई लोळे,श्री.संजय दादा नवले,श्री.घटे सर,श्री. अशोक अलोने,कोष्टी समाजाचेबीडजिल्हाध्यक्ष श्री.सुरेशराव असलेकर, श्री.बाळासाहेब गलांडे, एसबीसी संघर्ष नेते श्री.बालाजी चिनके,श्री. बाळासाहेब दिवटे,श्रीमती मीरा वीर,मुख्य संयोजक श्री.सतिशराव सपाटे व कार्यक्रमास उपस्थित कोष्टी समाजातील राजकीय,सामजिकआणि विविध क्षेत्रातील लोक कार्यक्रमाला उपस्थित होते.यावेळी सत्काराला उत्तर देताना विद्याताई तारळकर यांनी सांगितले की,आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण जो नारिशक्ती म्हणून



माझा सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ देऊन माझा यथोचीत सन्मान केला त्यामुळे आम्हाला सामाजिक,धार्मिक क्षेत्रात काम करण्यास आणखीन बळ व आगळी वेगळी ऊर्जा मिळाली आहे त्या बद्दल मी सर्वांना धन्यवाद देते.समाजाने पाठीशी कौतुकाने थाप दिली त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे असे त्यांनी सांगितले.आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# शांतता व संयम पाळत धार्मिक सण साजरे करावेत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जनतेला आवाहन

### कायदा हातात घेणाऱ्यांवर, पोलिसांना मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा

मुंबई /प्रतिनिधी

महाराष्ट्र हे 'प्रगतिशील राज्य' असून या ठिकाणी जातीभेदाला थारा नाही. नागपूर शहरांमध्ये १७ मार्च रोजी राज्याची सामाजिक घडी विस्कटणारी घटना घडली. या घटनेमुळे राज्याच्या शांततेला धक्का बसला. सध्या सर्वधर्मीयांचे सण सुरू आहेत. नागरिकांनी संयम बाळगून शांतता राखत हे सण साजरे करावेत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत नागपूर घटनेवर आधारित निवेदनाद्वारे केले.

नागपूर येथील प्रकरणात पोलीस शांतता प्रस्थापित करण्यासाठी गेले होते. त्यांच्यावरही जमावाने हल्ला केला. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हातात घेणाऱ्या आणि पोलिसांना मारहाण करणाऱ्या कुणालाही सोडले जाणार नाही. त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी इशाराही दिला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागपूर शहरात १७ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता महाल परिसरात औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी काही संघटनांनी गवताच्या पेंड्यांची प्रतीकात्मक कबर काढून आंदोलन केले. याबाबत गणेश पेठ पोलिसांनी गुन्हे दाखल केले. मात्र या आंदोलनाबाबत अफवा पसरली व काही समाज घटकांनी हंसापुरी भागात जमाव करीत हिंसक आंदोलन केले. या भागात १२ दुचाकी जाळण्यात आल्या. तसेच भालदापूर भागात दोन जेसीबी, क्रेन आणि चारचाकी वाहनांची जाळपोळ करण्यात आली. येथे दगडफेकही करण्यात आली. या संपूर्ण घटनांमध्ये ३३ पोलीस जखमी झाले असून पाच नागरिक जखमी झाले आहेत. यापैकी तीन नागरिकांना उपचाराअंती सोडण्यात आले, तर दोन नागरिकांवर उपचार सुरू आहेत. तसेच पोलिस उपायुक्त दर्जाचे तीन अधिकारीही जखमी झाले आहेत. यामध्ये एका अधिकाऱ्यावर कुऱ्हाडीने मारहाण झाल्याचे दिसून येत आहे.

जमावाला शांत करण्यासाठी पोलिसांना अश्रुधुरांचा वापर करावा लागला. तसेच सौम्य बळाचा वापर करीत शांतता प्रस्थापित करावी लागली. याप्रकरणी गणेशपेठ पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून तहसील पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नागपूर शहरातील ११ पोलीस ठाणे अंतर्गत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या पाच तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच या भागात प्रवेश स्तरावर तपासणी नाके उभारण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

घटनास्थळावरून ट्रॉली भरून दगड मिळाले आहेत. घरांवर दगड जमवून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. हा हल्ला सुनियोजित पॅटर्न असल्याचे दिसून येते. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांनी एकमेकांचा आदरभाव करीत आपले सण साजरे करावे. शांतता राखावी, कायदा व व्यवस्था टिकवण्यासाठी शासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करीत दंगा करणाऱ्यांबाबत कुठल्याही जाती धर्माचा विचार न करता कडक कारवाईच्या इशाऱ्याचा पुनरुच्चारही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.

# अनधिकृत अतिक्रमण हटवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब खरात यांचे दुसऱ्या दिवशीही आमरण उपोषण

## अंबड नगर परिषदेच्या गलथान व उदासीन कारभार

प्रतिनिधी । अंबड

अंबड शहर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असल्याबरोबरच धार्मिक, शैक्षणिक,क्षेत्रात नावाजलेल्या मोठ्या बाजारपेठेचे शहर आहे. परंतु स्थानिक अंबड नगर परिषदेच्या गलथान व उदासीन कारभाराचा शहरवासीयांना, वाहनधारकांना, विद्यार्थ्यांना, भाविकांना मनस्ताप सहन करावा लागतो. त्यातच राजकीय वरद हस्ताने अंबड नगरपरिषद कारभार चालत असल्याचे शोकांतदायी चित्र वारंवार दिसून येते. अंबड शहरातील अतिक्रमण बाबत ठोस उपाययोजना करणे गरजेचे असताना देखील राजकीय दबापोटी व आर्थिक लाभा पाई शहरवासीयांना असूविधेचा सामना करावा लागतो.



यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब खरात हे लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करत असून सलग दुसऱ्या दिवशीही त्यांचे उपोषण सुरू आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की कस्बे अंबड येथील चिखली अर्बन शाखा अंबड जवळील पिती नगर मध्ये जाण्या येण्यासाठी एक जुना रस्ता आहे परंतु सदरील रस्त्यामध्ये राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या धनदांडग्या व्यक्तीने अतिक्रमण करून तेथे मोठ्या बिल्डिंगचे बांधकाम चालू केले आहे.त्यामुळे रस्ता बंद झाला आहे. वसाहती मधील नागरिकांना, विद्यार्थ्यांना, महिलांना,वयस्कर व्यक्तींना याचा मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे त्यामुळे पित्ती नगर मधील रस्त्यात केलेले अनधिकृत अतिक्रमण त्वरित हटविण्यात यावे व बांधकाम बंद करण्यात यावे या रास्त मागणी संदर्भात सलग दुसऱ्या दिवशी बाबासाहेब खरात यांचे आमरण उपोषण सुरू आहे.

या अतिक्रमण संदर्भात ठोस पुरावे असताना देखील अंबड नगरपरिषद राजकीय व आर्थिक अमिषाला बळी पडत मूग गीळून गप्प बसली आहे. याचा सर्वत्र निषेध केला जात आहे त्याचबरोबर बाबासाहेब खरात यांच्या आमरण उपोषणाला सर्व स्तरातून मोठा पाठिंबा मिळत आहे.

# वंचित बहुजन आघाडीची मागणी

## संजय गांधी निराधार नवीन लाभार्थींची यादी फलकावर लावण्यात यावी

प्रतिनिधी । बदनापुर

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बदनापूर येथील तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे.की मागील दिनांक ९/७/२०२४ रोजी संजय गांधी निराधाराची बैठक घेऊन त्या बैठकीत मंजूर झालेल्या निराधार सदस्य यांची यादी फलकावर लावण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. पाच ते सहा महिने झाले तरी या संजय गांधी निराधार लाभार्थींची यादी फलकावर लावण्यात आली नाही . यामुळे या योजनेत किती लाभार्थी पात्र व किती लाभार्थी अपात्र आहे हे समजण्यास सोपे होईल.पात्र संजय गांधी निराधार लाभार्थींची यादी जर आठ ते दहा दिवसांच्या आत लावण्यात न आली तर तहसिल कार्यालय येथे जन आक्रोश आंदोलन केले जाईल.व याची सर्व



जबाबदारी ही प्रशासनाची राहील असे तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या निवेदनात प्रकाश मगरे तालुकाध्यक्ष बदनापूर, दिपक खाजेकर तालुका महासचिव बदनापूर,सुरेश आर्सूड ,थोमा आठवले,विशाल गायकवाड,राजु अंभोरे,विकास अंभोरे,दाविद आठवले, संदिप आठवले, यांच्या सह अनेकांच्या या निवेदनावर सह्या आहेत.

# बोरखेडच्या बिनविरोध सरपंच अपात्र

प्रतिनिधी । बीड

१९८४ साली केलेल्या अतिक्रमणामुळे बोरखेडचे बिनविरोध सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना जिल्हाधिकारी बीड यांनी अपात्र केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की बोरखेड सरपंचा विरोधात माजी सरपंच शहादेव हिंदोळे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ ज ३ व १६ अन्वये तक्रार दाखल केली होती. बोरखेडचे सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांनी गट नंबर १९७ मध्ये सन १९८४ साली अतिक्रमण केले असून तेव्हापासून सदरील जमीन वहीती करत आहे तसेच १९९२ ९३ मध्ये अतिक्रमण प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे देखील एडवोकेट के एस पंडित यांनी निदर्शनास आणून दिले.पंडित साहेबांना ॲड सुनिल वडमारे,ॲड.नागेश तांबारे, ॲड.अक्षय मुळे, ॲड.अभिजीत कदम यांनी सहकार्य केले. अतिक्रमण प्रकरणात बोरखेड सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना अपात्र करण्याचे आदेश माजी जिल्हाधिकारी बीड यांनी दिले आहेत.

# पाण्याचा काटकसरीने वापर करून उत्पादनात वाढ करण्याची बोरखेड येथे शेतकऱ्यांनी घेतली शपथ

## पाणी हेच आपले जीवन आहे – जलप्रेमी बाजीराव ढाकणे

प्रतिनिधी । बीड

रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी जलजागृती सप्ताहानिमित्त मौजे बोरखेड ता जि बीड येथील यशोदिप शेतकरी बचत गटांच्या शेतकरी सदस्यांनी सहभागी होत आपल्या गावातील सर्व शेतकरी बांधवांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याची गरज आहे अशी संकल्पना करून सर्वांनी मिळून पाण्याचा काटकसरीने वापर करूया असा निर्णय घेत शपथ घेतली. यावेळी जलप्रेमी बाजीराव ढाकणे, बाळासाहेब गावडे यांच्यासह यशोदिप शेतकरी बचत गटांचे अध्यक्ष रामचंद्र शिंदे, सचिव विठ्ठल घरत , सदस्य विठ्ठल शिंदे, महादेव गावडे , आदम खॉ पठाण , बाबु बोराटे सुशिल बोराटे, गोरख अनपट, दत्ता सोनटक्के, खंडु सगळे इत्यादींची उपस्थिती होती.



राज्यात १६ मार्च ते २२ मार्च दरम्यान साजरा केला जातो जलजागृती सप्ताह या निमित्ताने आपणही पाणी जपून वापरले पाहिजे पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीसाठी पाणी आवश्यक आहे. मानव, प्राणी, वनस्पती आणि संपूर्ण पर्यावरणाच्या संतुलनासाठी पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

– जलप्रेमी ,बाजीराव नवनाथ ढाकणे

# स्व. रामदास गाडेकर यांचे निधन

प्रतिनिधी । जाफराबाद

जाफराबाद तालुक्यातील नळविहिरा येथील शेतकरी स्व. रामदास दामोधर गाडेकर ( वय ६२) यांचे आज मंगळवार दि. १८ मार्च रोजी सकाळी एक वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले असून त्यांच्यावर नळविहिरा येथे अंत्यसंसार करण्यात आले. त्यांच्या रक्षाविसर्जनाचा कार्यक्रम गुरुवार दि. २० मार्च रोजी होणार आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुलगा, मुलगी, नातवंडे, बहिणी असा मोठा गाडेकर परिवार असून ते श्री. महादू गाडेकर यांचे वडील होते.

# स्वानंद सार्वजानिक वाचनालय व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण येथे

## जागतिक ग्राहकदिन, संत तुकाराम बीज आणि शहाजीराजे जयंती संपन्न

प्रतिनिधी । केज

स्वानंद सार्वजनिक वाचनालय व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता.केज.जि. बीड येथे विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रम संपन्न झाले.दिनांक १५ मार्च २०२५ रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. ग्राहकांचे हक्क,अधिकार आणि कर्तव्य या विषया वर परिसंवाद घेण्यात आला.दिनांक १६ मार्च २०२५ रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीजोत्सव साजरा करण्यात आला.संत तुकाराम महाराज एक अद्वितीय महापुरुष व तुकाराम गाथा या विषया वर चर्चासत्र घेण्यात आले दिनांक १८ मार्च २०२५ रोजी स्वराज्य संकल्पक छत्रपती शहाजी राजे भोसले यांची जयंती साजरी करण्यात आली.



सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी कार्यालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.विविध कार्यक्रमात प्रमुख पाहुणे व मागदर्शकम्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड,एस.के.वैरागे, अरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, मुख्यमंत्री दुत अमोल राऊत, हरि ओम गायकवाड,संजयसोनवणेमधुकर गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.सर्व कार्यक्रम हे वेगवेगळया तारखेतसंपन्न झाले.सर्व कार्यक्रमांचा अध्यक्षीय समारोप माजी प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे व संस्थेचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

प्रतिनिधी । बीड

गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष झाल्या मुळे शिवसेनेच्या व सर्व समाज बांधवांच्या वतीने रतन गुजर यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक कार्यात अग्रेसर राहिलेले रतन गुजर यांची नुकतीच अखिल भारतीय गुर्जर देवसेना संघटनेकडून बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे त्याबद्दल त्यांचा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सत्कार करुन म्हटले की, मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख आहे आणि तुम्ही गुजर समाजाचे जिल्हाप्रमुख आहात आपले दोघांचे काम आहे समाजकारण या कार्यामध्ये आपल्याला कोठेही अडचण आल्यास शिवसेना एक परिवार म्हणून तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील व तुमच्या समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शिवसेना तुमच्या बरोबर आहे तसेच याप्रसंगी गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान




बहिरवाळ यांनीही आम्ही आता मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावू तुम्ही काम करत राहा तुमच्या पाठीशी सर्व समाज उभा राहील असे आश्वासन दिले यावेळी तरी या कार्यक्रमाला विनायक गुजर, सुनील गुजर, हनुमान बजरंग गुजर, लक्ष्मण बहिरवाळ व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

# कृष्णा आंधळे ९८ दिवसांपासून फरार, लवकरात लवकर पकडून जेरबंद करा

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा गेल्या ९८ दिवसांपासून फरार आहे. पोलिस त्याचा शोध घेत असून, अद्याप त्याचा शोध लागलेला नाही. याबाबत बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, कृष्णा आंधळे सापडणे अतिशय गरजेचे आहे. कारण त्याच्याकडे महत्त्वाचे पुरावे असल्याचे देशमुख म्हणाले.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला जवळपास ९८ दिवस पूर्ण झालेत. मात्र यातील आरोपी कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. कृष्णा आंधळे तपास यंत्रणेला सापडणे अतिशय गरजेचे आहे. कारण त्याच्याकडे महत्त्वाचे पुरावे असण्याची शक्यता धनंजय देशमुख यांनी



वर्तवली आहे. कृष्णा आंधळेला लवकरात लवकर पकडून जेरबंद करावे. तसेच यातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी असे धनंजय देशमुख म्हणाले. कृष्णा आंधळेकडे जास्त पुरावे असतील. त्यामुळं तो पोलीस यंत्रणेच्या ताब्यात येण्यासाठी एवढी दिरंगाई करत आहे. तर नक्कीच त्याच्याकडे ठोस पुरावे असतील आणि त्याची चौकशी गरजेची आहे असे धनंजय देशमुख म्हणाले.


नेमका कोण आहे कृष्णा आंधळे ?

कृष्णा आंधळे हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी आहे. तो छत्रपती संभाजीनगरला पूर्वी पोलीस भरतीची तयारी करत होता. ती तयारी करता करता तो गुन्हेगारीमध्ये आला. यापूर्वी त्याने संभाजीनगरलाही काही गुन्हे केले आहेत. त्याच्या घरची परिस्थिती हालाकीची आहे. पत्र्याचं घर आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामध्ये तो आरोपी आहे.

# औरंगजेबाची कबर ही पुढची अयोध्या

## प्रकाश आंबेडकरांचे ट्वीट चर्चेचा विषय

छत्रपती संभाजीनगर – खुलताबाद येथे असलेली औरंगजेबाची कबर सध्या वादाचं कारण बनली आहे. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यासारख्या हिंदुत्त्ववादी संघटनांनी ही कबर हटवावी, अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे राज्यातील अनेक राजकीय नेत्यांनी तसेच वेगवेगळ्या पक्षांनीही ही कबर हटवावी अशी मागणी केलीय. दरम्यान, एकीकडे हा मुद्दा चर्चेचा विषय बनलेला असताना वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या ट्वीटची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे. त्यांनी आपल्या ट्विटमध्ये औरंगजेबाची कबर ही पुढची अयोध्या होणार आहे, असं म्हटलंय.



प्रकाश आंबेडकर यांनी नुकतेच एक्स या समाजमाध्यमावर औरंगजेबाच्या कबरीवर एक भाष्य केलं आहे. त्यांनी या ट्विटमध्ये भाजपा आणि आरएसएसवर सडकून टीका केली आहे. 'ते औरंगजेबाला आगामी लोकसभा निवडणुकीचा अजेंडा बनवत आहेत. औरंगजेबाची कबर ही पुढची अयोध्या आहे. २०२६ साली होणाऱ्या निवडणुकीत भाजपा-आरएसएस औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावर निवडणूक लढवणार आहेत. होय तुम्ही खरं वाचलंय. औरंगजेबाची कबर भविष्यातील अयोध्यासारखा मुद्दा होणार आहे. २०२६ साली निवडणूक होणार आहे,' असं प्रकाश आंबेडकर आपल्या ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.

औरंगजेबाची कबर कशाला पाहिजे– एकनाथ शिंदे

दरम्यान, राज्यातील अनेक नेत्यांनी औरंगजेबाची कबर हटवून टाकावी अशी भूमिका घेतली आहे. खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही जी शिवभक्तांची भूमिका तीच माझी भूमिका असं म्हणत औरंगजेबाची कबर कशाला पाहिजे?

# प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या मंत्री राणेंची हकालपट्टी करा:विधिमंडळाच्या पायऱ्यांवर सत्ताधारी – विरोधक आमने–सामने

मुंबई /प्रतिनिधी

नागपुरात दोन गटांमध्ये सोमवारी रात्री हिंसाचार उफाळून आल्याने मंगळवारी विधिमंडळाच्या आवारात दिसून आले. महाविकास आघाडीच्या आमदारांनी हिंसाचाराच्या विरोधात आंदोलन केले. विरोधकांनी प्रक्षोभक वक्तव्ये करणाऱ्या मंत्री नितेश राणे यांची हकालपट्टी करा, अशी मागणी केली. याच वेळी सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी आंदोलन केले.सत्ताधारी व विरोधक दोघांनीही विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केल्याने गोंधळ उडाला. या वेळी सत्ताधारी व विरोधक भिडल्याने विधिमंडळ परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यात राजकारण चांगलेच तापले आहे. औरंगजेबाची कबर हटवण्यात यावी यासाठी नागपूरसह विविध भागात बजरंग दल विश्व हिंदू परिषदेकडून आंदोलन सुरू आहे. त्यातच सोमवारी नागपूरमध्ये दोन गटांत हिंसाचार झाल्याने त्याचे पडसाद




# गेवराईच्या प्रशिक्षणार्थी पीएसआयची आत्महत्या

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धपिंपरीयेथील रहिवासीतथा नाशिकयेथील पोलिस अकादमीतील प्रशिक्षणार्थी उपनिरीक्षक सोमेश्वरभानुदास गोरे(२८) याने अकादमीच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली.सोमवारी दुपारी ३.३० वाजता हीघटना घडली. आत्महत्येचे कारणअद्याप स्पष्ट झालेले नाही.

सोमेश्वर गोरे याने त्याचे मामापांडुरंग पाटील यांच्याकडे राहूनशिक्षण पूर्ण केले होते. मागील वर्षीमार्च महिन्यात त्याचीएमपीएससीद्वारे पोलिस उपनिरीक्षकम्हणून निवड झाली होती. त्यानंतरप्रशिक्षणासाठी नाशिकलापाठवण्यात आले होते. मागील तीनमहिन्यांपासून गोरे नाशिक येथीलअकादमीत प्रशिक्षण घेत होता.

आई–वडील वीटभट्टी मजूर

सोमेश्वर यांचे कुटुंब अल्पभूधारकअसून त्यांच्याकडे दोन एकर जमीनआहे. त्यांच्या वडिलांनी मुलांनाशिक्षण देण्यासाठी १० वर्षांपूर्वी गावसोडून पुण्यात वीटभट्टीवर काम करतपै–पै जमवली होती. सोमेश्वरनेमामाकडे राहून बारावीचे शिक्षण पूर्णकेले होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



# खोक्याच्या परिवाराचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

## वन विभागाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा

प्रतिनिधी । बीड

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच 'खोक्या' उर्फ गुंड सतीश भोसले याचे काही गैरप्रकार आणि पैशाचा माज दाखवणारे व्हिडीओ व्हायरल झाले होते. त्याने एका व्यक्तीला अमानुषपणे बेदम मारहाण केल्याचेही प्रकरण समोर आले होते. तो आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याचेही स्पष्ट झाले होते. पोलीस शोध घेत असताना अखेर खोक्याला प्रयागराजमधून पोलिसांनी बेड्या ठोकल्या. बीड पोलीस सतीश भोसले याला घेऊन छत्रपती संभाजीनगरमध्ये पोहोचले. तत्पूर्वी सतीश भोसलेच्या ठिकाणांवर वनविभागाने बुलडोझर चालवत कारवाई केली. यावरून राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया आल्या. यानंतर आता सतीष भोसले याच्या पत्नीने उपोषण सुरू केल्याची माहिती मिळाली आहे.

बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खोक्याच्या पत्नीने आमरण उपोषण सुरू केले आहे. घर पाडणाऱ्या वन विभागाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा. ८ घरे वनविभागाने उद्ध्वस्त केली. आम्हाला त्याच गावात शासनाने जागा उपलब्ध करून पक्के घर बांधून द्यावे. ढाकणे परिवाराला झालेल्या मारहाणीत सतीश भोसले त्याचे तीन भाऊ व वडील यांचा काही संबंध नाही, तरीसुद्धा त्यांच्यावर गुन्हे दाखल केले त्यांना निर्दोष मुक्त करावे. फरार आरोपींना तात्काळ अटक करावी.

माझा नवरा आमचा परिवार व पारधी समाज यांच्या विरोधात खोटा अपप्रचार सुरू आहे तो तात्काळ थांबवण्यात यावा . अशा प्रमुख मागण्या खोक्या उर्फ सतीश भोसले याच्या पत्नीने केल्या आहेत.आम्हाला घरदार नाही, लेकरांना उन्हात बसावे लागते आमचे घर वन खात्याने उद्ध्वस्त करून टाकले आहे. आमचे पुनर्वसन करण्यात यावे. आम्हाला घरदार नाही, आमच्या लेकरांना उन्हात बसावे लागत आहे. आमचे मालक अटक झाले पुढचे आरोपी अटक झाले पाहिजे. आमच्या महिलांना मारहाण केली. गावगुंडे कोणते आहेत, त्यांना शोधून घेतला पाहिजे. जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरू राहणार आहे, असा निर्धार पत्नीने व्यक्त केला. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सतीश भोसलेच्या बहिणीने प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. सतीश भोसले माझा भाऊ आहे.

मी या प्रकरणात आजपर्यंत आले नव्हते. त्याची जी काही चौकशी चालू आहे ते आम्ही मोबाइलवर पाहात होतो. जो काही अन्याय होतोय तो खरा आहे का खोटा वगैरे कळेलच. पोलिसांची चौकशी सुरू आहे. ही कायदेशीर चौकशी आम्हाला मान्य आहे. पण बुलडोझरने त्यांचे घर पाडले. २-४ तासांनी असे समजले की, त्यांचे घर पेटवून दिले. आम्हाला रात्री समजले. आम्ही सकाळी ताबडतोब इथे आलो. त्यांचे घरदार पाडण्यात आले. लहान मुलींना मारहाण झाली. त्यांच्यांवर बीडच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांना बघण्यासाठी आम्ही इथे आलो आहेत. आमची विनंती एवढीच आहे की, आम्हाला न्याय मिळवून द्यावा. हे सगळे करणाऱ्या लोकांना अटक करा

# अंबाजोगाईत आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नींचा निघाला मुक मोर्चा

## विविध मागण्यांचे उपजिल्हाधिकार्यांना दिले निवेदन

प्रतिनिधी । अंबाजोगाई

आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नी व त्यांच्या कुटूंबियांना न्याय देण्यात यावा. त्यांच्या मागण्या मान्य करण्यात याव्यात. या व विविध मागण्यांसाठी बुधवारी विधवा महिलांचा मोठा मोर्चा राजीव गांधी चौकापासुन निघाला. उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे महिलांनी विविध मागण्यांचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना दिले. या मोर्चाचे नेतृत्व आधार माणूसकीचा संस्थेचे अध्यक्ष ॲड.संतोष पवार यांनी केले. या मोर्चात शेतकरी संघटनेचे विभागीय अध्यक्ष कालिदास आपेट, किसानपुत्र आंदोलनाचे सुदर्शन रापतवार, अचूत गंगणे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

अन्नत्याग आंदोलन शेतकरी सहवेदना दिना निमित आत्महत्याग्रस्त शेतकरी यांच्या विधवा पत्नी व महिलांचा मुक मोर्चा बुधवारी दुपारी १२ वाजता राजीव गांधी चौकातून निघाला. हा मोर्चा मोंढा, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी महिलांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना दिले. या निवेदनात प्रत्येक आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटूंबाला २५ लाख रूपयांचे अर्थसहाय्य देण्यात यावे. कुटूंबातील विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात यावे. या कुटूंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विनातारण कर्ज तात्काळ मिळावे.



# बोरखेडच्या बिनविरोध सरपंच अपात्र

प्रतिनिधी । बीड

१९८४ साली केलेल्या अतिक्रमणामुळे बोरखेडचे बिनविरोध सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना जिल्हाधिकारी बीड यांनी अपात्र केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की बोरखेड सरपंचा विरोधात माजी सरपंच शहादेव हिंदोळे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ ज ३ व १६ अन्वये तक्रार दाखल केली होती. बोरखेडचे सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांनी गट नंबर १९७ मध्ये सन १९८४ साली अतिक्रमण केले असून तेव्हापासून सदरील जमीन वहीती करत आहे तसेच १९९२ ९३ मध्ये अतिक्रमण प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे देखील एडवोकेट के एस पंडित यांनी निदर्शनास आणून दिले.पंडित साहेबांना ॲड सुनिल वडमारे,ॲड.नागेश तांबारे, ॲड.अक्षय मुळे, ॲड.अभिजीत कदम यांनी सहकार्य केले. अतिक्रमण प्रकरणात बोरखेड सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना अपात्र करण्याचे आदेश माजी जिल्हाधिकारी बीड यांनी दिले आहेत.

# अंबाजोगाईतील श्री दत्तनगर कॉलनीतील ओपन स्पेस वर होणाऱ्या अतिक्रमणाच्या विरोधात रहिवासी एकवटले तीव्र आंदोलनाचा इशारा

## नगरपरिषदेच्या जलतरणाचा दुरुपयोग; महिला रहिवासी यांना होतोय नाहक त्रास

प्रतिनिधी । अंबाजोगाई

अंबाजोगाई येथील सर्व्हे क्र. १७०/१ मधील दत्त नगर कॉलनीतील मंजुर ले आऊट मधील ४१०० चौ. मिटर ओपन स्पेस वर अंबाजोगाई येथील व्यापारी लोक नगर परिषदचे तत्कालीन मुख्याधिकारी यांच्याशी संगणमत करत खोटे बनावट भाडेपत्राचा दस्त तयार करून बेकायदेशीर रित्या अतिक्रमण करत आहे या अतिक्रमणाच्या विरोधात श्री दत्तनगर कॉलनीतील रहिवाशांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सर्व्हे क्र. १७०/१ मध्ये अंबाजोगाई नगर परिषद यांन ले. आऊट मंजूर करुन घेतला व विविध साईझचे प्लॉट पाडून कोदी भूखंड नगर परिषद कर्मचारी यांना वितरीत केले व उर्वरित भूखंड लिलावाद्वारे नागरिकांना विक्री केले आहेत. नगरपरिषद अंबाजोगाई यांनी लाखो रुपये खर्चुन दत्त नगर कॉलनीच्या ओपन स्पेस मधील ९६३ चौ. मीटर जागेत अनाधिकृतपणे जलतरणचे बांधकाम केले असून, सदरचे जलतरणचे बांधकाम नगररचनाकार बीड यांनी सुधारीत अभिव्यास क्र. ८१ दिनांक १८/०८/२००८ प्रमाणे रद्द केलेले आहे. तरीही नगर परिषदाचे जलतरण चालविण्यासाठी धनदांडग्या लोकांना अनाधिकृतपणे भाड्याने दिले आहे. मात्र या जलतरणांचा दुरुपयोग करत असून सदरचे लोक कॉलनीत येवून पत्ते, जुगार खेळणे दारुच्या पार्टी करणे, कॉलनीतील मुख्य रस्त्यावर वाहने लावून जाणाऱ्या येणाऱ्या रहिवाशी लोकांना अडथळा करीत आहेत. कॉलनीतील महिलांसमोर नागवे उघडे येवून महिलांना त्रास देत आहेत यामुळे महिलांना हा त्रास सहन करावा लागतो आहे.

यावर न थांबता जलतरण चालविणारे व्यापारी लोग दत्त नगर कॉलनीतील ओपन स्पेस मधील उटावतील ३१३७ चौ. मीटर खुल्या जागेवर वाईट नजर ठेवून नगर परिषद अंबाजोगाईचे तत्कालीन मुख्याधिकारी यांचेशी संगणमत करुन बोगस भाडेपत्र करुन घेवून सदर खुल्ला जागेत व्यवसायीक स्वरुपाचे बांधकाम करण्याचा प्रयत्न करु लागले आहेत.

नगर परिषद अंबाजोगाई यांना मंजूर ले आऊट मधील ओपन स्पेसची जागा रहीवाशीयांच्या पूर्व परवानगीशिवाय इतराना भाड्याने देता येत नाही. तसेच न.प. यांना ओपन स्पेस ची जागा केवळ सार्वजनिक वापरसाठी ठेवणे बंधनकारक असतांना सदरची जागा खाजगी व्यापारी लोकांना व्यवसायीक उद्देशा करिता देता येत नसताना बेकायदेशीररित्या भाड्याने दिलेली आहे.

हे खाजगी व्यापारी लोक राजकीय बळाचा वापर करुन कॉलनीतील ओपन स्पेस च्या जागेवर अतिक्रमण करावयाच्या उद्देशाने जेसीबी च्या सहाय्याने पायाचे खोदकाम केले असून तसेच ओपन स्पेस मधील पुर्वीचे झाडे, बगिवाची रस्ते उखडून टाकू लागले म्हणून तेथील रहिवाशी यांनी दिनांक त्यांना अडविले व त्या बाबत न.प. अंबाजोगाईचे मुख्य कार्यकारी अधिकारी टोंगे मॅडम यांच्याकडे दिनांक २१ फेब्रुवारी रोजी रितसर निवेदन दिलेले असून रहिवाशी लोकांनी वरिल लोकांच्या विरुद्ध मा. दिवाणी न्यायालय व अंबाजोगाई येथे नियमित दिवाणी दावा क्र. ९५/२०२५ प्रमाणे घोषणा व चिरकाल मनाई हुकूम मिळणे बाबतचा दावा दिलेला आहे. त्या प्रमाणे मा. कोर्टाने वरील लोकांना कारणे दाखवा नोटीस काढलेला आहे.

# लीडच्या सर्वेक्षण स्पर्धेत आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल, पैठण ठरली देशात नंबर वन.....!

प्रतिनिधी । पैठण

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथील आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल ही शाळा लीड या अभ्यासक्रमांतर्गत सुरू असलेल्या सर्वेक्षण स्पर्धेत राज्यात, झोनल आणि देश अशा तिन्ही स्तरावर नंबर वन म्हणून निवडली गेली आहे.

लीड या अभ्यासक्रमांतर्गत देशात एकूण नऊ हजार शाळांचा समावेश आहे. यामधे २०० विद्यार्थी संख्येच्या गटात तब्बल एक हजार शाळांना मागे टाकत पैठण येथील आयकॉन पॅराडाईज प्रायमरी इंग्लिश स्कूलने देशात एक नंबर पटकावला आहे.

लीड ने आपली एक वेगळी निवड पद्धत विकसित केलेली आहे. यांमध्ये शिक्षकांनी दिलेला अभ्यासक्रम नेमून दिलेल्या वेळेत किती टक्के पूर्ण केला हे तपासले गेले. झालेल्या अभ्यासक्रमावर किती चाचणी घेतल्या ते तपासले.

या चाचण्यात विद्यार्थ्यांना किती गुण आहेत आणि सर्व विद्यार्थ्यांची सरासरी गुणवत्ता तपासली. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन गृहपाठ आणि परीक्षांचे नियोजन किती टक्के केले यालाही गुणांकन दिले गेले. यामुळे शिक्षक, शाळा, विद्यार्थी आणि पालक यांच्या सहभागातून शाळांची गुणवत्ता तपासली गेली. या चारही स्तरात आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल देशात नंबर एक राहिली हे विशेष!प्रत्येक आठवड्याला ही गुणांकन तपासले गेले. ३० आठवड्याच्या या दीर्घ कालावधीत सातत्य राखण्यासाठी झालेले प्रयत्न बहुमूल्य आहेत, असे लिडचे कोर्डिनेटर शूम बॅनर्जी सर, फदीम खान, धीरज गादीया यांनी निकाल देताना म्हटले आहे




विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान, पैठण संचलित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल, पैठण ही देशात अव्वल आल्याने संस्था कोषाध्यक्ष सौ.शीला तांबे आणि प्राचार्य आर.बी. रामावत यांनी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मंगल कोळगे यांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापिका श्रीमती मंगल कोळगे मॅडम यांच्या मार्गदर्शनात सौ.लता पवार, सौ.सोनाली गोरे, सौ.कविता दसपुते, श्रीमान अशोक चव्हाण, श्री एम.एस.नरके, सौ. शीतल मुंडे, सौ. रुचिका कुलकर्णी, श्रीमती हर्षदा मुळे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या या सामूहिक यशाबद्दल संस्था अध्यक्ष संतोष तांबे, सचिव मानसी नवथर, उपाध्यक्ष विशाल तांबे, सहसचिव सौ.अंजली पवार, संचालिका डॉ.अनुराधा गायकवाड, संचालक कैलास मुके पाटील, संचालिका इंजि. ज्ञानेश्वरी ससाने, संचालिका प्रा. प्रतिक्षा गोरडे,

# मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना मातृशोक

प्रतिनिधी । आष्टी

आष्टी तालुक्यातील आदर्शगाव आनंदवाडी, सराटेवडगाव येथील शिक्षक तथा सांगवी पाटण येथील सुदर्शन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ कारभारी बोडखे सर यांच्या मातोश्री अंजनाबाई कारभारी बोडखे (वय ९२) यांचे वृध्दापकाळाने बुधवार दि. १९ मार्च २०२५ रोजी पहाटे निधन झाले. मातोश्री स्व. अंजनाबाई या जुन्या पिढीतील सुसंस्कारित माळकरी वारकरी, महिला होत्या. लोकसंस्कृती जपणाऱ्या शांत, संयमी व अध्यात्म विचाराच्या होत्या. लोक साहित्याचा अनमोल ठेवा त्यांच्याकडे होता. जात्यावरचे गीते, नागपंचमीचे गीते, हळदी प्रसंगी म्हटली जाणारी गीते, लग्न विधी गीते अशा अनेक लोकगीतांचा खजिना स्व. अंजनाबाई यांच्या रूपाने काळाच्या पडद्याआड गेला.

अंत्यत गरिबीतून कुटूंब सधनतेकडे घेऊन जाण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांचा थोरला मुलगा अंबादास बोडखे यांचे तीन वर्षापूर्वी निधन झाले आहे. त्यांच्या पाठीमागे मुलगा मुख्याध्यापक साईनाथ बोडखे सर, मुलगी सौ. चंदाबाई भाऊसाहेब विधाते, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रा. डॉ. जी. पी. बोडखे व सतिश बोडखे सर यांच्या चुलती होत्या. अंत्यविधीस माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. भीमराव धोंडे यांचे बंधू राजेंद्र धोंडे, रूईनालकोलचे माजी सरपंच संजय



नालकोल, प्रा. डॉ. संजय धोंडे, राजीव गांधीं विद्यालय कापुरवाडी, अहिल्यानगरचे मुख्याध्यापक बाळासाहेब दुसुंगे, बाळासाहेब बेरड, महावीरशेठ सुराणा, पिंपळा, शेख महेबुब फौजी, पाडूरंग खराडे, सुरेश खराडे, दिलीप नवले, नवनाथ गदादे, संपत गोरे, संतोष आस्वर, चेअरमन बबन नन्नवरे, चेअरमन राजाराम नन्नवरे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रशासन अधिकारी माऊली बोडखे, माजी सरपंच डॉ. राम बोडखे, पांडुरंग धोंडे, सरपंच भीमराव बोडखे, सेवानिवृत्त पीएसआय शेख अन्सारभाई, इंजि. पी. बी. बोडखे, नारायण बनसोडे, निवृत्ती बनसोडे, शिवाजी गवारे, मोहन बांगर, सुभाष बनसोडे, ह. भ. प. निवृत्तीदादा बोडखे, राजेंद्र सायंबर, माळशिखरे, बाळासाहेब राऊत, दत्तात्रय विधाते, कोंडीभाऊ झांबरे, रंगनाथ बोडखे, वनसिंग बोडखे, चेअरमन भानुदास बोडखे, सोमनाथ सुबरे, भाऊ तरटे, सतिश आळेकर, श्रीगोंदा, संतोष जाधव, संजय जाधव आदि उपस्थित होते.

# जय भवानी महाविद्यालयात शहाजीराजे भोसले यांची जयंती साजरी

प्रतिनिधी । पाटोदा

दिनांक :१८ मार्च: पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात शहाजीराजे भोसले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. इतिहास विभागाच्या वतीने या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते. तर




प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते. प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याच्या शुभहस्ते शहाजीराजे भोसले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# फुलाबाई कांबळे यांचे निधन

प्रतिनिधी । मानुर

शिरूर शहरातील प्रगती कॉम्प्युटरचे संचालक लक्ष्मीकांत कांबळे यांच्या मातोश्री फुलाबाई दगडू कांबळे यांचे मंगळवारी दीर्घ आजाराने निधन झाले.त्या ७५ वर्ष वयाच्या होत्या.त्यांच्या पश्चात दोन मुलं,एक मुलगी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिरूर शहरातील अमरधाम मध्ये त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.



# गावकऱ्यांनी व्यक्त केले आ.प्रकाश सोळंके,जयसिंग सोळंके यांचे आभार

## उपळी कुंडलिका धरणातून पाणी सोडले

वडवणी / प्रतिनिधी

आ.प्रकाश सोळंके यांच्या प्रयत्नातून व युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते उपळी येथील कुंडलिका धरणातून १९ मार्च २०२५ बुधवारी रोजी सकाळी ११ वाजता नदीपात्रात पाणी सोडण्यात आले.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील उपळी येथील कुंडलिका धरणातून शेतकऱ्यांच्या हितासाठी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी समस्त गावकऱ्यांच्या वतीने आ.प्रकाश सोळंके यांच्या कडे केली जात होती. या मागणीला प्रथम प्राधान्य देत आ.प्रकाश सोळंके यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकारी यांनी धरण साईटवर जाऊन पाणीसाठा किती प्रमाणात शिल्लक आहे. याची चाचपणी केली आणि आ. प्रकाश सोळंके यांच्या सुचनेनुसार लागलीच प्रकिया सुरू केली. या धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी खुद्द माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग सोळंके यांनी उपस्थिती दर्शवुन नदी पात्रात पाणी सोडण्याचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचा व अधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार केला. नदी पात्रात पाणी सोडल्याने धरणाखालील उपळी,लोनवळ बाबी,कुप्पा, सुलतानपुर,



दुकडेगांव,चिंचाळा,धानोरा, राजेवाडी,केंडेंपिंप्री,पुनंदगांव,परडी माटेगांव सह आदी वाड्या, वस्त्या, तांड्यावरील गावांना, शेतकऱ्यांना, पशुधनांना या मुळे मुबलक पाणी मिळणार आहे.यावेळी माजी सभापती प्रशांत सावंत, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, सभापती संभाजी शिंदे,डॉ.दत्तात्रय दुधाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, नगरसेवक सचिन सानप, माजी सरपंच सुभाष सावंत, माजी सरपंच प्रविण सावंत, चेअरमन दत्तात्रय मायराने,वसंत आबा सावंत, युवा नेते ड.आनंद काळे, तानाजी आजबे, संचालक सचिन लंगडे, सरपंच माधव शेंडगे, सरपंच सुभाष आजबे,रामराव पवार, ज्ञानोबा राठोड, रामराव चव्हाण,बबन भिसे, सरपंच प्रल्हाद सोनवणे, दिनेश सावंत, वसंत वडचकर, नारायण बडे, ड.प्रदिप शेळके,शेख ताहेर, सचिन हलकर, विजय मोरे, राजाभाऊ काळे,बबन आडे सह आदींची उपस्थिती होती.

# टाकळी ते नाथ पैठण पायी दिंडीचे शिवणी येथे उत्साहात स्वागत

प्रतिनिधी । केज



श्री.ह.भ.प.वै.गोपिचंद बाबा भारती यांनी सुरू केलेल्या केज तालुक्या तील श्री दत्त संस्थान टाकळी ते नाथ पैठण ४६ वर्षांपासून पायी दिंडीचे आयोजन करीत आहेत. दि.१३ मार्च गुरुवार रोजी दत्त संस्थान टाकळीयेथुन नाथ पैठणकडे पायी दिंडीचे प्रस्थान झाले. श्री.ह.भ.प.वै.गोपिचंद बाबा भारती यांची मुले श्री.ह.भ.प.विष्णुमहाराज भारती व श्री.ह.भ.प. अविनाश महाराज भारती यांनी अखंड हा पायी दिंडी सोहळा वारकरी, भक्तांच्या सहकार्यांने सुरू ठेवला असुन या दिंडीचे दि.१३ मार्च २०२५ गुरुवार रोजी प्रस्थान झाले आहे.या दिंडीचे कुशल नेतृत्व ह.भ.प. अविनाश महाराज भारती यांनी उत्कृष्ट केले असुन या दिंडीचे श्री.आबासाहेब शिंदे,विजय सुपेकर, जालिंदर शिंदे,श्रीमंत शिंदे विलास शिंदे,बाबुराव घोडके यांनी उत्साहात स्वागत केले.मौजे शिवणी येथे आबासाहेब शिंदे यांनी या पायीं दिंडीतील वारकऱ्यांना व भक्तांना भोजन व्यवस्था करुन भोजन दिले.प्रसाद सेवना नंतर दिंडीचे नाथ (मुंगी) पैठणकडे प्रस्थान झाले. यावेळी श्री.ह.भ.प. अविनाश महाराज भारती किर्तनकार ह.भ.प लहाने ताई,श्री.राजाभाऊ कदम मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी,वारकरी, भक्त गण हे यावेळी उपस्थित होते.



प्रतिनिधी । पैठण

दावरवाडी येथील शांती ब्रह्म श्री संत एकनाथ महाराज षष्ठी निमित्त बुलढाणा अमरावती जालना अंबड पानवडगाव या ठिकठिकाणी गावातील दिंडीचे दावरवाडी मध्ये प्रस्थान मंगळवार पासून सुरू होते यामध्ये गावातील भोजन पाणपोई मोफत आरोग्य शिबिर चहा अंघोळीसाठी गरम पाणी वारकऱ्यांच्या दिंडीच्या गावातील नागरिकांनी सोय करून ठेवली होती रात्रभर गावातील भजन कीर्तन गाव तसे भक्तिमय वातावरण झाले होते दावरवाडीच्या शिवछत्रपती मैदानावरील हजारो वारकऱ्यांची उपस्थिती दर्शवली

# भोसले घराण्याची जागा शहाजीराजे स्मारकासाठी परत करा -श्रीमंत मुधोजी राजे भोसले,पुढील जयंतीला मुख्यमंत्री येणार - रावसाहेब दानवे पाटील

## जयंती कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

वेरूळ येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची ४३१ वी जयंती वेरूळ येथे मोठ्या उत्साहात साजरी होत असल्याचा आनंद असल्याचे प्रतिपादन नागपुर गादीचे मुधोजी राजे भोसले यांनी केले. भोसलेंच्या शासनानंतर वेरूळची जागा ही महाराष्ट्र शासनाकडे गेली. म्हणजे शासनाची जागा शासनाकडे गेली.म्हणून शासनाला तिला वापस देण्यात आमची काही हरकत राहणार नसल्याचे प्रतिपादन श्रीमंत मुधोजी राजे भोसले नागपूर संस्थान यांनी केले. स्वराज्यसंकल्पक शहाजी राजे भोसले यांची ४३१ वी जयंती वेरूळ येथील शहाजीस्मारक येथेसाजरी करण्यात आली.यावेळी मुधोजी राजे भोसले यांनी हे वक्तव्य केले.भोसले घराण्याची २०२ एकर जागा होती ती जागा शासनास मिळावी. या ठिकाणच्या पुर्ण विकासा साठी जी काही मदत लागेल.त्यासाठी विवीध संस्था सामजिकसंस्थांच्या माध्यमांतून करण्यात येणार असल्याचे मुधोजी राजे भोसले यांनी सांगितले.या जयंती कार्यक्रमाचे उद्धाटक रावसाहेब दानवे यांच्या हस्ते संपन्न झाले



छत्रपती शिवाजी महाराजांच्यामूळ घराण्याच्या ठिकाणी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे जयंतीमोठ्या उत्साहात साजरी होत असून यावेळी महाराष्ट्र शासनाच्या संस्कृती विभागाने येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम केले पुढच्या वर्षी मा.मुख्यमंत्री जयंतीला येतील त्यावेळी अजून या स्मारक विकासाला पूर्ण गती मिळणार आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. राजे शिवाजीराव जाधव सिदखेड राजा,शहाजी राजे भोसले स्मारक नियोजन आढावा समिती चे अध्यक्ष जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्मारक कामासाठी अधिवेशनाच्या नंतर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षते खाली लवकरात बैठक होईल व येथे घृष्णेश्वर मंदिर व वेरूळ येथील पर्यटक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वजांच्या गढीवर तसेच स्वराज्य संकल्पक शहाजीराजे स्मारकावर नतमस्तक होण्यासाठी येतील यासाठी हे स्मारक आंतर राष्ट्रीय दर्जाचे भव्यअसेल असे प्रतिपादन केले. यावेळी पोलिस अधीक्षक विनयकुमार राठोड ,प्रा. रवींद्र बनसोड यांनी स्वराज्यसंकल्पक शहाजी राजे भोसले यांच्या जीवन चरित्रावर सविस्तर व्याख्यान दिले. प्रास्तावीकपर बोलताना जयंती समिती संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण म्हणाले की,स्मारकाचे सध्या काम चालू आहे. भविष्यात राजे विठोजी राजे यांनी बांधलेलातलाव परीक्षा परिसरातील जागा व नगररचना विभाग यांनी भविष्यातील ५० एकर जागेमध्ये बाग-बगीचा करण्याचे नियोजित केले आहे.तसेच इतर अशी एकूण मिळून २०२ एकर मध्ये भविष्यात स्वराज्य संकल्पक शहाजीराजे स्मारकाचे नियोजन करण्याचा संकल्प केला आहे.स्वराज्य संकल्पक शहाजीराजे फाउंडेशन स्थापनेची घोषणा यावेळी करण्यात आली.स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती समिती अध्यक्ष डॉ.विलास पांगारकर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

शाहीर सुरेश जाधव यांनी शिवकालीन शाहिरीसादर केली.प्रसिध्द अभिनेत्री अलका कुबल यांनी शिवशाही महानाट्याचे संवाद सादर केले.प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी उदेग अंबे राजे आले जी,माझा राजा माझा शिवबा,गर्जा महाराष्ट्र माझा,शिव जन्म उत्सव सोहळा आदी गाणे सह कलाकारा समवेत सादर केला.संभाजीनगर येथिल कलावंतानीही विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम,शिवकालीन इतिहास,पोवाडे असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. वेरूळ,खुलताबाद, दौलताबाद,संभाजीनगर, नाशिक,जालना जिल्हा यासह संपूर्ण महाराष्ट्र, राजस्थान,जयपुर,गोवा, कर्नाटक,हरियाणा आदी राज्यातून शिवप्रेमी गांवकरी मोठया संख्येने उपस्थित होते.यावेळी माधव अवरगंड,छावा जिल्हाप्रमुख शिवाजी दादा ठोंबरे,डॉ.उद्धव राजे काळे,परमेश्वर नलावडे, विजय काकडे,सतीश जगताप,अक्षय राजे ताठे, रवींद्र सोनवणे,मच्छिंद्र घोरपडे,संदीप सरकटे, ज्ञानेश्वर ढोबळे,विनोद सरकटे,मनोज सरकटे, विजय ननवरे,अमोल टकले,अमोल सोनवणे, डॉ.प्रशांत अवसरमल आदी मान्यवर यावेळी उपस्थित होत




प्रतिनिधी । केज

जॉर्ज ओहम या भौतिक शास्त्रज्ञाच्या प्रतिमेस या शाळेतील आदर्शशिक्षिका श्रीमती गिताताई अंडील व श्री.राजाभाऊ कदम मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले.जॉर्ज ओहम हे बव्हेरियन-जर्मनीतील भौतिक शास्त्रज्ञाचा जन्म दि.१६ मार्च १७८९ रोजी झाला.ते गणित तज्ञ होते.

राष्ट्रनिर्माते डॉ आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी

# जयभीम पाटील उपाध्यक्षपदी कपिल कांबळे तर सचिवपदी सम्राट हिरे यांची निवड

प्रतिनिधी । भोकर

विश्वरत्न राष्ट्रनिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती महोत्सवानिमित्त दि.१६ मार्च २०२५ रोजी जेष्ट पत्रकार एल ए हिरे यांच्या अध्यक्षतेखाली लुंबिनी बुध्द विहार म.फुले नगर भोकर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले या वेळी सर्वानुमते पुढील प्रमाणे राष्ट्र निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती घोषित करण्यात आली ती खालील प्रमाणे अध्यक्ष जयभीम पाटील ,उपाध्यक्ष कपिल कांबळे, सचिव सम्राट हिरे ,कोषाध्यक्ष साहेबराव मोरे ,सहसचिव देवा हाटकर ,संघटक सुभाष तेल , सिध्दार्थ जाधव, गौतम कसबे,विक्रम क्षिरसागर,



सदस्य मनोज शिंदे, प्रशांत हानमंते, संतोष डोंगरे, बाबुराव गाडेकर, सतिष जाधव,प्रितम डोंगरे, बाळा कदम, वैभव धुतुरे, जितेंद्र कोकाटे ,सल्लागार जेष्ट पत्रकार एल.ए.हिरे, भिमराव दुधारे, नामदेव वाघमारे, पि.पी.हानवते, सुरेश कावळे, डॉ मनोज गिमेकर, विजय कावळे, राजु दांडगे,अविनाश गायकवाड, कांतीलाल जोंधळे, दलित डोंगरे,आनंद ढोले, एस.आर.जोंधळे,यु.एन.ऐडके,दत्ता डोंगरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे यावेळी रमेश गायकवाड ,आशोक डोंगरे , धम्मा कदम ,संदीप गायकवाड , छोटु सोनकांबळे , माधव कांबळे ,कैलास दांडगे,त्रिरत्न कावळे, संघदिप वारघडे,सुनिल दुधारे करण कांबळे मिलींद दुधारे ,मयुर ढोले,मनोज सोनकांबळे ,यांच्या सह भिम अनुयायी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती

# नागपूरमधील घटनेची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करा- खा. वर्षा गायकवाड

## राजकीय स्वार्थासाठी सत्ताधारी पक्षाने महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण बिघडवले

प्रतिनिधी । नवी दिल्ली

सामाजिक सौहार्द जपणाऱ्या नागपूर शहरात हिंसक घटना घडावी हे महाराष्ट्राला शोभणारे नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे नागपूरचे प्रतिनिधी आहेत पण शांतताप्रिय शहरात दंगल भडकली जाते व त्याची कल्पना सरकारला नाही हे आश्चर्याचे आहे. गृहविभाग व राज्य सरकारचे हे अपयश आहे. सत्ताधारी पक्षाने राजकीय स्वार्थासाठी शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण बिघडवले आहे. नागपूरमधील हिंसक घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर लवकरात लवकर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना खासदार प्रा. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, नागपूरची घटना अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे. नागपूर नेहमीच शांतता आणि सामाजिक ऐक्यासाठी ओळखले जाते, देशभरात दंगली होत असतानादेखील, नागपूरने कधीही अशा प्रकारच्या हिंसाचाराला थारा दिला नव्हता पण दुर्दैवाने मागील काही दिवसांपासून फडणवीस सरकारमधील काही मंत्री जाणीवपूर्वक भडकाऊ वक्तव्ये करत आहेत, समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत आज त्याचे परिणाम नागपूरच्या रस्त्यांवर दिसत आहेत. या परिस्थितीसाठी मुख्यमंत्री जबाबदार आहेत, गृहमंत्री म्हणून ते आपली जबाबदारी चोख पार पाडू शकले नाहीत. समाजात तेढ निर्माण करणाऱ्या आणि



बेताल वक्तव्य करणाऱ्या मंत्र्याला मंत्रिमंडळातून तात्काळ हटवावे.

महाराष्ट्राला थोर साधू संत, महापुरुषांचा वारसा लाभलेला आहे, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्रात अशा प्रकारचा हिंसाचार व्हावा ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्रात सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. धर्म आपल्या जागेवर व राजकारण आपल्या जागी आहे परंतु काही लोक धर्माच्या आधारावर राजकारण करून स्वतःचा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत आहे हे दुर्दैवी आहे. नागपूरच्या नागरिकांनी कृपया अफवांवर विश्वास ठेवू नये, शांतता राखावी, कोणत्याही षडयंत्राला बळी पडू नये,

# नरेंद्र मोदी हे पूर्वजन्मी शिवाजी महाराज होते, खासदार पुरोहित यांच्या या वक्तव्याने संताप !

## संभाजी ब्रिगेड आक्रमक : खासदार प्रदीप पुरोहित यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

पुणे - महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेर सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान आणि बदनामी केली जात आहे. विशेषतः भाजपच्या नेत्यांकडून अशा प्रकारची वक्तव्ये वारंवार केली जात असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. संभाजी ब्रिगेडने भाजप खासदार प्रदीप पुरोहित यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. त्यांनी म्हटले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या जन्मी शिवाजी महाराज होते या प्रकारचे विधान संसदेच्या सभागृहात करणे अत्यंत निषेधार्ह आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही. त्यांची तुलना फक्त छत्रपती शिवाजी महाराजांसोबतच होऊ शकते. भाजप खासदाराचे हे दुर्दैवी आणि आक्षेपार्ह वक्तव्य प्रशांत कोरटकरसारख्या लोकांना पाठबळ देणारे आहे.संभाजी ब्रिगेडने सरकारवरही निशाणा साधत, औरंग्याच्या कबरीवर आग लावण्याची भाषा करणाऱ्या सत्ताधारी मंत्र्यांनी आणि भाजप नेत्यांनी पुरोहित प्रकरणावरही प्रतिक्रिया द्यावी, असे आवाहन केले आहे. तसेच, प्रशांत कोरटकर याला अजूनही अटक न झाल्याबाबत सरकारवर आरोप केला आहे. संभाजी ब्रिगेडने तमाम शिवप्रेमींना आवाहन केले आहे की, या मनुवादींच्या कटकारस्थानांविरोधात लढा देण्याची वेळ आली आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे शिवद्रोह्यांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. भाजप खासदार प्रदीप पुरोहित यांनी संसदेत छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यांच्या या विधानामुळे संसदेत एकच खळबळ उडाली. भाजप खासदार प्रदीप पुरोहित यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या विधानामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. त्यांनी नरेंद्र मोदी हे त्यांच्या मागील जन्मात छत्रपती शिवाजी महाराज होते असे वक्तव्य केले. त्यांच्या या विधानानंतर सभागृहात गोंधळ उडाला आणि उपसभापतींनी ते विधान सभागृहाच्या कामकाजातून वगळण्याचे आदेश दिले. प्रदीप पुरोहित यांनी सांगितले की, गिरिजा बाबा नावाच्या एका संताने मला सांगितले की देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पूर्वजन्म छत्रपती शिवाजी महाराज म्हणून झाला होता. त्यामुळेच ते राष्ट्र उभारणीचे कार्य करत आहेत. या विधानावर राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, विरोधकांनी यावर टीका केली आहे. भाजपा खासदार प्रदीप पुरोहित यांच्या वादग्रस्त विधानावर मोठा गदारोळ उडाला. सोशल मीडियावरही त्यांच्या या वक्तव्याची तीव्र टीका केली जात आहे.

काँग्रेसच्या खासदार वर्षा एकनाथ गायकवाड यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देत भाजपवर निशाणा साधला आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, अखंड भारताचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारंवार अपमान करण्याचा आणि महाराष्ट्रासह संपूर्ण जगभरातील शिवप्रेमींच्या भावना दुखावण्याचा भाजपकडून सुनियोजित कट रचला जात आहे. या लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांची मानद टोपी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शिरावर ठेवून मोठा अपमान केला आहे. आता या भाजप खासदाराने दिलेले हे घृणास्पद वक्तव्य ऐका. आम्ही शिवाजी महाराजांचा वारंवार अपमान करणाऱ्या भाजपचा तीव्र निषेध करतो. भाजप ही शिवद्रोही आहे. आम्ही हा अपमान सहन करणार नाही. नरेंद्र मोदींनी त्वरित देशाची माफी मागावी आणि या खासदाराला निलंबित करावे. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून विरोधकांनी भाजपवर जोरदार टीका सुरू केली आहे.

